नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

ऑ क्टो ब र १ ९ ५ ०

या अं कां त

☆

* डॉ. य. खु. देशपांडे
* श्री. शिवदासपंत बार्लिंगे
* प्रा. द्रा. ल. अडोणी
* प्रा. म. के. शे टे
* प्रा. शां ता रा म
* श्री. मु. प. भिशीकर
* श्री. ना. रा. शें डे
* श्री. मनोहर देशपांडे
* श्री. ब. ना. एकबोटे

इ. इ. इ.

☆

संपादक :

वामन कृष्ण चोरघडे

वर्ष पांचवें] किंमत आठ आणे [अंक सहावा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्राच्या नामवंत साहित्यिक व विचारवंतांच्या

ललित व जीवननिष्ठ वाङ्मयसुमनांनी नटलेला

'युगवाणी'चा दिवाळी अंक नोव्हेंबरच्या

पांच तारखेला प्रसिद्ध होईल.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पंत व पलायनें

★

दा. ल. अडोणी, एम्. ए.

कौतुकवती वार्ता आणि विमला विद्या सारख्याच शीघ्रतेने पसरतात असें सुभाषितकार म्हणतो. वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या वार्तातील विधान किंवा त्यांची वर्णनपद्धति यांत चमत्कृति असल्याविना त्या वाचकांच्या मनाची पकड घेऊं शकत नाहीत. किंबहुना घटना व वार्ता यांतील व्यवच्छेदक घटक कोणता असेल तर तो चमत्कृति हा होय. हा संपादनशास्त्रांतील एक महत्त्वाचा सिद्धांत असून त्याच्या स्पष्टीकरणार्थ पुढील उदाहरण देण्यांत येतें.—" कुत्रा माणसाला चावला " ही एक साधी घटना; तथापि " माणूस कुत्र्याला चावला " ही 'झाली सनसनीदार,' चित्तवेधक बातमी. 'मोठ्यांच्या छोट्या गोष्टी' किंवा 'छोट्यांची मोठीं कृत्यें' मुद्दाम प्रसिद्ध करण्याचें कारण तरी हेंच. श्री. राजाजींना जन्मदिवस किंवा पं. नेहरूंना आपलें वेतन आठवत नाही हें जाड ठशांत प्रकाशित करण्याचें कारण त्या त्या व्यक्तींचा मोठेपणा व आनुषंगिक बाबींतला छोटेपणा.

अकल्पित, अनपेक्षित, असंभवनीय अशा घटनाहि आपलें लक्ष चटकन वेधून घेतात. अशा घटनांतील व्यक्तींशीं आपलें हिताहिताचे, सुखदुःखाचे, प्रेमद्वेषाचे, आदर-तिरस्काराचे वगैरे संबंध जितके दाट तितक्याच उत्कट भावना त्या प्रसंगीं आपल्या अंतःकरणांत उत्पन्न होतात. आला हजरतचे माजी बडे वजीर मिया लायकअल्ली यांच्या पलायनाच्या बातमीने साऱ्या भारतवर्षाचें लक्ष त्या घटनेकडे कसें आकर्षित करून घेतलें याचा अनुभव नुकताच येऊन चुकला. भागानगरला स्थानबद्ध असलेल्या या राजकीय कैद्याने आपल्या सहकुटुंब निर्गमनाने पोलिस बंदोबस्ताची शोभा केली. लाक्षागृहांतून शिताफीने सुटका करून घेतल्याबद्दल कुंती व पांडव यांचें कौतुक करावयाचें तर 'संस्थानीं' (State) कारभाऱ्यांच्या डोळ्यांत धूळ फेकून मुलेंमुली व बेगम यांसह यशस्वीपणें 'यः पलायते' करणाऱ्या या 'पलायनवीरा'बद्दल विस्मय-मिश्रित आदर कां वाटूं नये! समुद्रगुप्ताच्या विजयी आक्रमणाचा मार्ग निश्चित करणाऱ्या संशोधकाप्रमाणे लायकअल्लीची पळवाट व पद्धति यांबाबत कयास बांधण्याचे प्रयत्न सुद्धा वर्तमानपत्रांच्या वार्ताहरांकडून कांहीं थोडे झाले नाहीत.

'रणे चाप्यपलायनम्' असा सर्वमान्य सिद्धान्त असतांना पळ काढणाऱ्या महाभागाचा 'पलायनवीर' म्हणून केलेला उल्लेख कित्येकांना 'वदतोव्याघाता'—सारखा आत्मखंडनात्मक वाटेल. 'धर्मयुद्धाहुनी कांहीं क्षत्रियास नसे भलें' असें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गीताई सांगते. जीवाच्या लोभाने पळून न जातां धारातीर्थी देह ठेवणें हा शूराचा धर्म. ' संभावितस्यचाकीर्तिर्मरणादतिरिच्यतें ' हें माहित असूनहि स्वधर्मरक्षणासाठी लढणाऱ्या मराठ्यांनी व राष्ट्रधर्मपरायण आंग्ल सैनिकांनी प्रसंगविशेषीं पलायनाची पळवाट स्वीकारलीच की नाही ! किंबहुना फ्लँडर्सच्या रणभूमीवरून मोठ्या शर्थीने ' यशस्वी माघार ' (Glorious Retreat) घेण्यांत पलायनपटु सेनापतीने जें कौशल्य दाखविलें, त्याबद्दल विजय प्राप्त केल्याप्रमाणे त्याचे गुण गाण्यांत आले हें सर्वश्रुत आहे. पूर्वीची युद्धें धर्ममूलक, तर आजकालची अर्थ-मूलक. यांतील कोणतीच ' धर्म्ययुद्धें नाहीत ' हें लक्षांत घेऊनच क्षात्रधर्मांत ही पळवाट काढली असावी व हा आपद्धर्म मान्य करण्यांत आला असावा असें वाटतें !

ज्यांच्या व्यक्तिमत्वाविषयी व कार्यासंबंधीं आपणाला असीम आदर वाटतो अशा राष्ट्रपुरुषांपैकी कित्येक 'पलायनवीर' आहेत हें विसरतां कामा नये. औरंगजेबाने स्थानबद्ध करून ठेवलेल्या श्रीशिवाजी महाराजांनी त्याच्या हातावर तुरी व इतरांना मिठाई देऊन आपली सुटका करून घेतली. चाणक्य-नीतीचा अवलंब करून मोठ्या शिताफीने मुक्तता करून घेतली म्हणून छत्रपतींच्या युक्तीचें, प्रसंगावधानाचें व पर्यायाने त्यांच्या पलायनाचें आपण सादर कौतुक करतों. दक्षिणेंतील काफरांना नेस्तनाबूद करण्याच्या ईर्षेने आलेल्या दिल्लीश्वराला सळो की पळो करून सोडलें तें गनिमी काव्याने लढणाऱ्या पलायनवीरांनी. राजाराम जिंजीला पळून गेला तेव्हा झाला प्रकार तो ' यथा राजा तथा प्रजा ' या न्यायानेच असें म्हणतां येईल. पाश्चात्य पुरुषश्रेष्ठांपैकी ' यःपलायते ' करणारे ' बोअर ' युद्धांतील चर्चिल व सुदान, ब्रह्मदेश यांतील पलायनप्रवीण फील्ड मार्शल वेव्हेल हे दुसऱ्या महायुद्धांतील नेते होते हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

पोलादी चौकटीच्या राज्यशासनाबद्दल प्रसिद्ध असणाऱ्या आंग्लशाहींतहि पलायनवीरांनी कांही कमी पराक्रम गाजविला असें नाही. ' ठोठावा म्हणजे उघडतें ' या ' शुभवर्तमाना'नुसार ' शोधा म्हणजे सापडतें ' हा कर्मयोग त्यांनी आचरून पाहिला व तो सफळहि झाला. कोंडाण्याची कोंडी कितीहि कठिण असली तरी ध्येयवादाचा पाठिंबा असणाऱ्या यशवंतीला द्रोणागिरीचा कडा लाभतोच व नरसिंह गड फत्ते करून निघून जातो. मग पोलादी चौकटींतहि एखादी फट आढळली तर त्यांत नवल तें काय ! स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी केलेलें समुद्रसंतरण व देशगौरव सुभाषचंद्र बोस यांनी स्थापिलेली ' हुकुमत-ए-आझाद हिंदोस्तान ' हे पलायन-वीरांच्या पराक्रमाचा परिपाक म्हटलें पाहिजे. सरकारच्या हातांतून निसटून भूमिगत होणारे–अज्ञातवास स्वीकारणारे जयप्रकाश नारायण यांच्यासारखे भारतीय; किंवा गॅरिबाल्डी, मॅझिनीसारखे पाश्चात्य देशभक्त हे एकाच प्रभावळींतील होत. ' पराभवो-त्सुत्सव एव मानिनाम्' हें कविवचन वत्सलांछनाप्रमाणे अशाच वीरांना भूषवितें.

वर उल्लेखिलेले अद्भुतरम्य पलायनप्रसंग आपल्या अंतःकरणाची पकड घेतात, कारण त्यांच्याशीं निगडित झालेले प्रभावी व्यक्तिमत्व, प्रखर ध्येयवाद व प्रचुर राष्ट्रभक्ति या प्रसंगांची वर्णनें वाचतांना किंवा ऐकतांना आत्मीयतेमुळे आपलें हृदय आशा, उत्साह, समाधान, हर्ष या भावनांनी भरून आल्याशिवाय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राहिलें नसेल. एखाद्या व्यक्तीसंबंधानें आपुलकी किंवा परकेपणा यांपैकी कोणती तरी वृत्ति स्थिरावली म्हणजे त्याच्या बऱ्यावाईट कृतीने आपल्या हृदयांत अनुकूल किंवा प्रतिकूल भावलहरी उत्पन्न होतातच. ही वृत्ति जितकी तीव्र, तितका भावनांचा कल्लोळहि उत्कट राहणार. ' लाडुबहादूर, कामांबातुर ' एवढाच ज्याचा लौकिक अशा पळपुट्या रावबाजीचे पलायनप्रसंग लज्जा, तुच्छता, जुगुप्सा, विषाद इत्यादि भावना निर्माण करतात. उलटपक्षीं लायकअलीसारख्या शत्रूचें पलायन आत्महीनता, विषाद, चिंता यांची छाया मनावर पसरवितें. वृत्ति जितकी तीव्र तितका भावनांचा कल्लोळहि उत्कट राहणार. प्रसंगांतील अनपेक्षितपणा, अकल्पितत्व व विस्मयकारकता यांमुळे तदनुसार अनुभूतींत विविधता निर्माण होतें इतकेंच. आता चमत्कृति ही केवळ प्रसंगनिष्ठ नसून वर्णनपद्धतींतहि राहूं शकते. चातुर्य असलें तर साधा प्रसंग सुद्धा खुलवून सुरस करून सांगतां येतो. किंबहुना ' प्रथनकौशल्यामुळे रचनेने—काव्यांत नावीन्य येतें ' असें एक मत आहे. प्रसंग व रचना या दोहोंतील वर सांगितलेल्या चमत्कृतिप्रकारांचा समवाय जेथें आढळतो तें स्थळ सहजच सर्वांना आपल्याकडे आकर्षून घेईल.

प्रस्तुत लेखाचें शीर्षक पाहून पंतांनी पलायन केव्हा केलें, किंबहुना असा प्रसंग गुदरण्यास त्यांनी आक्रमणाचा प्रयत्न तरी कधी केला, किंवा त्यांच्यावर झाला काय अशी शंका मनांत येते. अफाट काव्यसंपत्ति निर्माण करणाऱ्या मोरोपंतांची प्रसिद्धी आहे ती बुद्धिचापल्याबद्दल; शस्त्रनैपुण्याबद्दल नव्हे. उलट ते ' भीरु ' आहेत, पण फक्त विस्ताराच्या बाबतींत. एरव्ही आर्तस्वाने स्वोद्धारार्थ टाहो फोडून कारुण्यामोद रामाचा धावा करणारा मयुर दुसऱ्यावर धावून जाईल, किंवा श्रीमंत पेशवे सरकारचें (दुसऱ्या बाजीरावाचें) आमंत्रण नम्रपणें पण निस्संदिग्धपणें नाकारण्याइतकें मनोधैर्य ज्याच्या ठिकाणीं आहे तो (' होय भय न संसारीं हरिभक्तिरसायनाचिया पानें ' असा विश्वास असणारा) भयभीत होऊन पळ काढील हें सुतराम् शक्य नाहीं. तथापि दुसऱ्यांवर आलेल्या पलायनाच्या प्रसंगांचें कथन मात्र त्यांनी मोठ्या सहानुभूतीने व मार्मिकपणाने केलें आहे. पलायनासारखा रोमहर्षण प्रसंग व मोरोपंतांसारखे रचनाचतुर कवि असा योग आला म्हणजे त्या त्या प्रसंगीं ' आर्यापती 'च्या वाणीचा एक वेगळाच विलास दृग्गोचर होतो. किंबहुना अशा प्रसंगीं त्यांनी केलेल्या चित्रणाची बरोबरी दुसरा मराठी कवि क्वचितच करूं शकेल असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाही असें वाटतें. पंतांच्या काव्योद्यानांत परिभ्रमण केलें तर अशीं अनेक विहारस्थलें आढळतील. त्यांतील कांही निवडक कथाकुंजांत प्रवेश केला तरी या उद्यानाच्या सर्वांगसुंदर रचनाकौशल्याची कल्पना येईल. ' आपण कांही तरावया गावें ' या भावनेने काव्यरचनेस प्रवृत्त झालेला पंतांनी सर्वसामर्थ्यसंपन्न ' रणछोडदासा 'चे व इतरांचे पलायनप्रसंग कोणत्या व्यावहारिक दृष्टांतादिकांनी नटविले हें पाहूं या.

१. स्वयंवरें:—' कीर्ति घ्यावी लढून व वधू न्यावी हरून ' हा दंडक विशेष प्रचलित असलेल्या पौराणिक काळांत स्वयंवराचें रूपांतर समरांत व्हायला विलंब लागत नसे. अशा विवाहानंतर वेगळ्याने ' गोंधळ ' करण्याची आवश्यकता नसे.
 तो होण्यासाठी जमा झालेले इच्छुक यथाशक्ति प्रयत्न करीत. ' एक विरुद्ध इतर

सारे' (against the rest) असें या लढ्याचें स्वरूप असायचें. स्वातंत्र्याप्रमाणे कलत्रहि मिळविलें तरी टिकविणें काही सोपें नसतें. अशा स्थितींत पण जिंकणारे वीर (प्राणाची पर्वा न करतां !) प्राणप्रियेसाठी लढत व संधी सापडतांच तिच्यासह पलायन करीत. शृंगाराच्या पार्श्वभूमीवर झालेली वीररसाची योजना वधूवरांच्या संयोगाप्रमाणे (स्वयंवरप्रसंगीं उपस्थित नसणाऱ्या !) वाचकांना आल्हादकारक होते. ' विकारोऽपि श्लाघ्यो भुवनभयभंगव्यसनिन: ' या न्यायाने अशा वीरांचें पलायन देखील स्पृहणीय ठरतें. All is fair in love and war या उक्ती-प्रमाणे ' चतुर सुंदर ' राजकन्येसह केलेलें पलायन व त्याचें वर्णन देखील त्याच गुणांचें निदर्शक कसें असतें हें पुढील उदाहरणांवरून दिसून येईल.

(i) रुक्मिणीहरण:—विप्राने आणलेल्या पत्रिकेप्रमाणे श्रीकृष्ण संकेत-स्थळीं-देवीच्या मंदिराजवळ-दबा धरून बसले. इष्ट घटीच्या वेळीं अभीष्टाची प्राप्ती होते किंवा नाही हे आपल्या लोल नेत्रांनी वैदर्भी पाहते तों काय—

' माझा मूर्त मनोरथ तो रथ आला प्रियास घेऊन

आणि ' माळा उचलिता, प्रिय आपणहि रथावरूनिया लवला
लव लागेना तों घे अंकीं, करुणासमुद्र कालवेला.
गेला घेउनि हरि निजभाग सुखें, त्यास म्हणति नचि 'पळे'
हंसे मुक्ता नेली, मग केला कलकलाट काकांनी,
हाकांनी नभ भरिलें, जाय सुरांच्या हि नाद हा कानीं.
पुष्कळ खळ बळ घेउनि हरिवरि आले नृपाळ ते कुतरे
उतरे एकहि न कसीं, कनकाशीं कोटि भांडतां धुतरें (कृ. ८३)

(ii) सुभद्राहरण:—' सौभद्र ' सारख्या सुंदर कृतीची उभारणी ज्यावर केली असा हा प्रसंग नाट्यवंचनायुक्त आहे. त्रिदंडी संन्याशाच्या कटांत एक भाऊ सामील तर दुसऱ्याला त्याची गंधवार्ताहि नाही. पर्वप्रसंगीं सारे समुद्रस्नानाला जात होते. संधी साधून—

' तेव्हां धावुनि बैसे पार्थ सुभद्रारथीं, जैसा पार्टी
सुचिरक्षुधितब्राह्मण, ' हां ! हां ! ' म्हणतांहि वाढल्या ताटीं.

कपटयतीनें केलेला अनर्थ पाहून जेव्हा रक्षक धावून आले, तेव्हा सव्यसाची अर्जुनाने धनुष्यबाणाऐवजी वाक्बाणांचाच उपयोग करून आघाडी जिंकली. सरावांतील सारथी-श्रीकृष्ण—नसल्यामुळे पार्थाला धाक दाखवून वेळ मारून न्यावी लागली असें दिसतें.

' त्यातें म्हणे,' सुभद्रामुक्ताहर वीर अर्जुन मराल,
समरा लक्ष हि या, परि काक तुम्हीं गति विसर्जुन मराल.
धर्मानुज मीं अर्जुन सिंह, तुम्हीं शशकिशोर, आटोपा, '
ऐसें नीट दटाउनि जाय सुभद्रा हरूनि तो पार्थ. (कृ. वि. ८६)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

२. उड्डाणस्पर्धा:—युलिसिस व ॲचिलिस हे पाश्चात्य पौराणिक वीर प्रख्यात पलायनपटु (light footed) होते असा उल्लेख ट्रॉयच्या कथेत आढळतो. महाभारतकालीन क्रीडाप्रकारांत 'पळण्याच्या शर्यती'चा समावेश होत असे की काय हा प्रश्न आहे. तथापि शल्याच्या तोंडीं घातलेल्या अन्योक्तींत हंस व कावळा यांच्या उड्डाणस्पर्धेचें वर्णन पंतांनी मोठें रेखीव असें केलें आहे. (कर्णपर्व, अ. २८)

'शतपात जाणतों मी, उडेन एकेकपात शत गांवें;—
उड्डीन एक, दुसरें अवडीन, तिजें प्रडीन, संडीन.
इत्यादि पात शत मी मीं दावूनि विपक्षगर्व खंडीन'

अशी शेखी मिरविणाऱ्या 'शतपातपंडित' गर्विष्ठ कावळ्याने एक गति जाणणाऱ्या हंसाला आव्हान दिलें. स्पर्धा सुरू होतांच—

'उड्डीनप्रमुखें जीं होतीं शतसंख्य ठाउकीं पतितें,
तीं सारीं दाखविलीं हंसप्रवरापुढेंचि त्या पतितें.
स्वज्ञातिश्रेष्ठाचें गतितांडव पाहतांचि, काकांनीं
हर्षभरें नभ भरिलें, 'का का का का' अशा स्वहाकांनीं.
मृदुपातें हंस उडे, काकाहुनी हीनशक्तिसा भासे
ऐसें मुहूर्तभरि तो दावी, तों काकमंडळी हासे.
मागें धावे वायस, हंस पुढें, सोडिला जसा तीर,
स्पर्धेंत काक नेणें कीं केवळ दूर राहिलें तीर.
न दिसे अग, नग, मग तग गगनीं खग नीच काय काढील ?'

अशी स्थिति झाल्यावर मात्र त्या नीचाला तग धरवेना. शक्तिहीनाची गर्वोक्ति ! ती अंगलट आल्याशिवाय कशी राहणार ! हंस विचारतो,—

तुंडाग्रें पक्षयुगें शिवसी काका ! क्षणक्षण जळाला,
या गतिचें नाम कथीं,—

समुद्रांत गटंगळ्या खाणाऱ्या त्या परपुष्ट व अहंमन्य कावळ्याला सदय हंसाने वांचविलें नसतें तर खासच 'सद्गति' मिळाली असती !

३ विजयी माघार:—सतरा वेळा जरासंधाचा पराभव केल्यावर त्यांतून हात मोकळे होतात न होतात तोंच कालयवनाच्या आक्रमणाची वार्ता श्रीकृष्णाच्या कानावर आली. स्वजनांच्या रक्षणाची नीट व्यवस्था करून–जलदुर्गाचा आश्रय घेऊन (द्वारका समुद्रांत वसवून) श्रीकृष्ण एकटेच बाहेर पडले. जरासंध व कालयवन यांचा पवनज्वलन संयोग होऊन द्वारकेची जाळपोळ होऊं नये–आपल्या प्रदेशांत युद्धप्रसंग टाळावा या गनिमी काव्याने प्रेरित होऊनच त्यांनी पलायनाचा मार्ग स्वीकारला. 'एकदा कृष्णपराभव करशील' असें शंकरांनी यवनाला दिलेल्या वराचें निमित्त होतेंच.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

‘ प्रभुमार्गे मंदमती, एकाकी धावला स्वयें यवनपती
सांपडलोंसे दावी प्रभु, खळ धरितो क्षणांत ऐसें भावी.
यवनास असें फसवी, ने दूर विलंबि फार भूमिभृदटवीं,
यवन म्हणे, “ पाठ शुभादेशी मजचि, न यदूद्वहा ! ठाक उभा.
काय पराङ्मुख पळसी ! अयशःकजळ कुळासि लाविसि मळसी ”
शंभुवर प्रतिपाळी; स्वीकारी भीरुरीतिला वनमाळी.
स्वाधिक्षेप न मानी, हांसे खळ परि न पूज्य सत्कृति हानि.
मग विश्वासनिवास दरीमाजि शिरे, तो हि त्याचि मागे सदरी
झाला प्रभुवर गुप्त — — — (कृष्णविजय–५१·३-७)

त्या ठिकाणीं मुचकुंदाच्या क्रोधाचा विषय करून परभारें यवनाला जाळून टाकलें. जरासंध सेनासमुद्र घेऊन पुन: आला असतां असाच प्रसंग येऊन ठेपला. त्यापुढे आपलें कांहीं चालणार नाहीं हें पाहून बलराम व कृष्ण यांना पर्वताचा आश्रय घ्यावा लागला. ‘ दग्धभू ’चें धोरण यशस्वी झालें असें समजून जरासंध व प्राण वाचवून गुप्तपणें बंधुद्वय आपापल्या स्थानीं गेलें.

महाभारतीय युद्धांत धर्म, भीम व नकुल, त्याचप्रमाणे कर्ण, अश्वत्थामा, जयद्रथ, शकुनी आणि इतर कौरववीर यांवर पलायनाचे प्रसंग आले. महायुद्ध जिंकण्याची महत्त्वाकांक्षा असणाऱ्यांनी त्यांतील प्रत्येक लढा जिंकलाच पाहिजे असें कांहीं नाहीं. (England looses battles but wins the war) या आंग्लपद्धतीप्रमाणे शेवटच्या तडाख्यांत सरशी मिळाली म्हणजे झालें. अशा प्रसंगांचें वर्णन संक्षेपानें केलें हें युक्तच आहे.

४. विजयासह माघार:—विराटपर्वांतील उत्तर गोग्रहणाच्या प्रसंगीं मात्र पंतांची वाणी पल्लवित झालेली दिसते. प्रसंगहि तसाच बाका. राजा विराट साऱ्या सैन्यासह सुशर्म्यांशीं लढण्यांत गुंतला असतां कौरवांनी दुसरी आघाडी उघडली. राजपुत्र उत्तर हा एक व बृहन्नडा हा अर्धवट एवढेच काय ते पुरुष मत्स्य नगरींत राहिलेले. तसा उत्तर कांहीं कमी नव्हता ! साऱ्या कौरवसैन्याचा पराभव करण्याची एकट्या ‘ भूमिंजया ’ची तयारी ! पण सारथी ? तेवढा मिळाला असता तर ! नृत्यशाळेंत या वाग्वीरानें मोठें बढाईचें भाषण केलें. शेवटी उत्तरेच्या सांगण्यावरून बृहन्नडेने सारथ्यकर्म स्वीकारलें व त्याचा रथ रणभूमिवर आणला मात्र. यूवराज भूमिंजय—

‘ कुरुकटकासि पहातां तो उत्तर बाळ फार गडबडला,
स्वपरबळावळ नेणुनि बालिश बहु बायकांत बडबडला,
बोले, “ बृहन्नडे ! हें कुरुबळ कल्पांत सिंधुसें गमतें,
ने रथ पुरांत, माझें मन नयनहि पाहतां बहु भ्रमतें.
एकाकी मी, रिपु बहु, ह्या पेशा कीर्ति काय हो ! मरणी !
आज्ञा नसतां आलों, रागें न भरेल काय हो ! तात ! ”

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असें म्हणत रथावरून उतरून जेव्हा या राजाबिंड्याने राजधानीकडे कूच करण्यास सुरवात केली तेव्हा बृहन्नडा त्यास धरण्यास धावूं लागली. पंतांची पुढील उत्प्रेक्षा फारच बहारीची आहे.

‘ वाटे, पुढे पळे तो स्त्रीसंगविरक्तधी कुमारमणी
पुत्रस्नेहें धावे यामागे शंभुची उमारमणी.’

रणभीरू उत्तरावर आरोपित केलेली सुरसेनानी कार्तिकेयाची संभावना व सव्यसाची बृहन्नडेपासून पळून जाणाऱ्या राजकुमाराबाबत कल्पिलेलें स्त्रीसंग-विरक्तीचें (स्त्रियांनी कार्तिकेय स्वामीचें नांव दर्शन घेऊं नये असा दंडक आहे) कारण मार्मिक-औपरोधिक आहे. (रणभरि भूमिंजय व भीरुवेषांतील-बुचडा सुटलेला, पदर सावरणारा धनुर्धर यांची पळपकड पाहण्यासारखी असेल.) पलायनाचें इतकें सुंदर समर्थन इतरत्र क्वचितच आढळेल. मयूराच्या कल्पनाकलापांतील हें एक मनोज्ञ पिच्छ आहे. मूर्तिमंत ‘ विजय ’ जवळ असतांनासुद्धा ‘ यःपलायते ’ करणाऱ्या या रडतरावाला विजयाचा धनी करण्यासाठी मग बृहन्नडेने मोठ्या वात्सल्याने युद्धकलेची बाळगुटी दिली.

५. पलायन ? शिव, शिव !—पुत्रस्नेहाने पळणाऱ्या पार्वतीची पंतांनी कल्पनाच केली, पण पार्वतीपतीवर मात्र असा प्रसंग खरोखरच येऊन ठेपला होता. एक आठवड्याचा अन्नसत्याग्रह व आत्मघाताची वृकासुराची तयारी यांनी कळवळून आशुतोष अशा भगवान् शंकरांनी औदार्यातिरेकाने ही आपत्ति आपल्यावर ओढवून घेतली. डोक्यावर हात ठेवतांच मारण्याचें सामर्थ्य भस्मासुराने महेशापासून मिळविलें. वृकस्वभावी दुष्टाने प्रत्यक्ष मृत्युंजयाच्याच डोक्यावर हात ठेवून वराचा खरेपणा पडताळून पाहण्याचा प्रयत्न केला. गुरुची विद्या गुरुला सफळ म्हणतात ती अशी !

‘ धावे पिसाळला वृक, सभय तपस्वी महेश एकाकी
जों जों भय धरि तों तों श्रीमन्मृत्युंजयाधि तो दावी
पाठी लागे यास्तव खळ, देव पळे भयें कृतागाच्या. ’

पण प्रणतवत्सलाविषयी असें का म्हणायचें ? यापेक्षा—

‘ बहु लाडका भजकशिशु पाठी लागोनि ओवळा शिवतो,
स्पर्शभयें काय पळे ब्रह्मांडगृहांत सोवळा शिवतो ?
उडवी ती भयवात्या जिकडे त्या शंभुपुंडरीकास
तिकडे वृकभुंग फिरे सद्भक्त खरा, वरी घरी कास. ”

हा भुंगा कमलमुखी शकुंतलेप्रमाणे कमलाप्रय शिवाच्या मागे लागल्यावर, ते गोंधळल्यास नवल तें काय !

भावी भयें भवानीभर्ता भगवान् भुले भला फार-
सुटल्या सटा समस्ता सुरसरितासलिलसर्प सोमसुधा सांडति सरणींत,….’
(कृष्णाविजय, अ. ८८)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भक्ताच्या भीतीने पळणाऱ्या महादेवाचा जटाजूट विसकटलेला, डोक्यावर बसवून घेतलेल्या गंगेचें पाणी व चंद्रांतून पाझरणारा सुधारस ओघळत आहेत, अलंकारभूत सर्प निसटतात, आणि या साऱ्यांना सावरतांना ज्यांची गाळण उडाली अशा धूम ठोकणाऱ्या कैलासनाथाचा अवतार बघण्यालायक असेल ! स्मशानवासी कपालीला भयानक रसाची अनुभूति देण्याचें श्रेय तरी वृकाला दिलेंच पाहिजे. बरें, यांत त्या बिचाऱ्याचा तरी काय अपराध !

> ‘ जेथे जेथे जाय प्रभू, तेथे भक्तवृक उभा मागें;
> रागें कसें भरावें अनुचर चुकल्याविना महाभागें !
> भागेना प्रबळखळव्याळ, बहु पुराणपुरुष तो थकला;
> दुःखिताचित्तें वोझें मानी बहुधा सुधांशुच्या शकला.’

शेवटी बटूचें (किंवा मोहिनीचें) रूप घेऊन हरीला हराच्या संकटाचें हरण करावें लागलें.

शिव व वृक यांवर केलेला सोवळ्याओवळ्यांतील पितापुत्राचा किंवा सेव्य-सेवकाचा आरोप देव व भक्त (!) यांच्या जोडीवर करण्यांत–भयानकाशीं वत्सल किंवा भक्तीचा संकर हंसतखेळत साधण्यांत पंतांची विनोदबुद्धि व रसिकता प्रत्ययास येतात. महादेवावर – भोळया सांबावर – वरदानामुळे ‘ भक्तेभ्यःपरित्रायस्व ’ असें म्हणण्याचा प्रसंग यावा ही घटनाच चमत्कृतिमय असून, पंतांनी ती शब्दार्थालंकारांनी नटवून रसपरिपोषांत उत्कटता आणली आहे.

वर विस्ताराने उद्धृत केलेल्या उताऱ्यावरून पंतांच्या ठायीं असलेल्या सूचि-प्रतिभा, मार्मिक अवलोकन, सहृदय कल्पकता, वेधक वर्णनशैली व सूक्ष्म विनोदबुद्धि यांचा समवाय कसा झाला होता याची कांहीशी कल्पना येईल. या पलायनप्रसंगांनी वाचकांना दुःखमय जीवनांतून ‘सद्यःपरिनिवृत्ती’चा-वाङ्मयांतील–‘ पलायन ’ वादाचा योडासा जरी अनुभव आला तर—‘ हेंही नसे थोडकें.’

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डॉ. केतकर आणि प्राचीन महाराष्ट्र

डॉ. यशवंत खुशाल देशपांडे

१ प्रास्ताविक

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त, त्यांचा गुणगौरव करून, त्यांच्या स्मारकाचा प्रश्न प्रामुख्याने महाराष्ट्रासमोर मांडला याबद्दल 'भवितव्या' चे संपादकांस आणि 'भवितव्या'च्या दि. २३।४।५० चे अंकांत लेख लिहिणाऱ्या साक्षेपी लेखकास शतशः धन्यवाद. विदर्भाने डॉ. केतकरांना जन्म दिला म्हणून, विदर्भवासीयांनी त्यांचें स्मारक करणें हें तर त्यांचें कर्तव्यच ठरतें; परंतु डॉक्टर केतकर यांचें लिखाण केवळ प्रासंगिक नसून, तें लिखाण महाराष्ट्र वाङ्मयांत सर्वकाळ ललामभूत होणारें असून, मराठी भाषा आहे तोंवर तें महाराष्ट्रीयांना उपकारकच होईल असें आहे. या दृष्टीने त्यांच्या स्मारकाचा प्रश्न अखिल महाराष्ट्राचा आहे. तरी ज्या नागपूर शहरांत डॉ. केतकर यांनी आपल्या मराठींतील ग्रंथलेखनाचा ओनामा केला, त्या नागपूर शहरीं तर त्यांचें स्मारक होणें औचित्यपूर्ण होईल. महाराष्ट्र आणि तदंतर्भूत विदर्भ त्यांच्या संबंधाने योग्य तें स्मारक करतीलच.

२ प्राचीन महाराष्ट्र

आज मी डॉ. केतकरांसंबंधाने लिहावयाकरिता लेखणी हातीं घेतली त्याचा उद्देश निराळा आहे. डॉ. केतकरांनी १५।२० वर्षांपूर्वीच संशोधनपूर्वक आणि अभ्यासपूर्वक असा प्राचीन महाराष्ट्राचा साग्र इतिहास लिहावयाचा संकल्प केला होता. त्या इतिहासाचा प्रथमखंड सातवाहन पर्व, कुरुयुद्धापासून शकारंभापर्यंत कथासूत्र आणणारा असा सन १९३५ सालींच छापून प्रसिद्ध केला. तो खंड महाराष्ट्रासमोर आहेच. त्यांनी आदिपर्व म्हणून एक पांचशे पानांचा खंड लिहून तो बराच पैसा खर्च करून छापून काढला होता. ते हैदराबाद येथे महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असतांना त्यांची माझी गांठ पडली होती, त्यावेळीं त्यांनी तो मला दाखविला होता. परंतु नवीन सामुग्री उजेडांत आल्यामुळे त्या खंडांत केलेली विधानें दुरुस्त करून घ्यावीं लागणार म्हणून झालेल्या खर्चाची व तो खंड प्रकाशित न झाल्यास होणाऱ्या नुकसानीची तमा न बाळगतां, त्या खंडाच्या सर्व प्रति

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांनी नाश केल्या. त्यानंतर त्यांनी प्राचीन महाराष्ट्राचे आणखी दोन खंड लिहून तयार केले. डॉ. केतकर जर जिवंत राहिले असते तर, द्रव्याच्या प्रतिकूल परिस्थितींतहि ते त्यांनी छापून प्रकाशित केले असते. परंतु नियति ही कांही वेगळीच होती. तसें कांही घडण्यापूर्वीच सन १९३७ च्या एप्रिलमध्ये त्यांचें निधन झालें. ज्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक अभ्युदयाकरिता त्यांनी आमरणान्त लेखणी हातीं धरली आणि आपल्या वैयक्तिक आणि कौटुंबिक स्वार्थाकरता कोणापुढे तोंड वेंगाडावयाचें नाही, हा बाणा अखेरपर्यंत निश्चयपूर्वक कायम ठेवला, त्या डॉ. केतकरांनी, पाश्चिमात्य संस्कृतींत जन्मलेल्या आणि स्वयंस्फूर्तीने त्यांच्याकरिता जिने महाराष्ट्र आपला देश, मराठी भाषा आपली भाषा आणि महाराष्ट्र संस्कृति ती आपली संस्कृति, असें आमरणान्त व्रत घेतलें, त्या आपल्या एकनिष्ठ पत्नीला महाराष्ट्राच्या पदरांत टाकून परलोकीं गमन केलें.

३ श्री. शीलवतीबाई केतकर

डॉ. केतकर हयात असतांना ज्या एकनिष्ठतेने श्री. शीलवतीबाई केतकर यांनी समाधानाने संसार केला त्याच एकनिष्ठतेने, डॉ. केतकरांचें निधन होऊन आज जवळ जवळ तेरा वर्षे झालीं, श्री. शीलवतीबाई प्रतिकूल परिस्थितीशीं झगडत आपलें आणि आपल्या मानलेल्या मुलीचें कष्टाने पण धीराने आणि उद्योग करून कधी पुण्यास तर कधी मुंबईस तर कधी लोणावळ्यास असें उदरपोषण करीत आहेत. अशाहि परिस्थितींत श्री. शीलवतीबाई डॉ. केतकरांच्या मित्रांना विसरल्या नाहीत. पण असें मात्र म्हणावयाची पाळी आली की हे मित्रच डॉ. केतकर यांच्या या एकनिष्ठ पत्नीस विसरले.

४ डॉ. केतकरांचें अप्रकाशित लिखाण

आज तेरा वर्षे झालीं, डॉ. केतकरांचे हे प्राचीन महाराष्ट्राचे दोन खंड, त्यांनी लिहिलेलें एक नाटक, आणि याशिवाय विविध विषयांवरील डॉक्टरांचे अनेक निबंध त्यांनी आस्थेने संरक्षून ठेविले आहेत. मध्यंतरीं एकदोनदा ते प्रसिद्ध करण्याकरिता आर्थिक मदत व्हावी म्हणून त्यांनी प्रयत्न करून पाहिला. पण तो यशस्वी झाला नाही. डॉ. केतकरांचे टीकाकार आणि प्रच्छन्न विरोधी यांचा समाजांत वरचष्मा असल्यामुळे स्वाभाविकपणेंच या कार्याला त्यांचें सहकार्य मिळूं शकलें नाही. येवढेंच नव्हे तर डॉ. केतकरांच्या वाङ्मयाच्या एका भक्ताने मला लिहिलेल्या एका पत्रांत नमूद केल्याप्रमाणे डॉ. केतकरांसंबंधाने लिखाण नियतकालिकांतून प्रसिद्ध करावयासहि महाप्रयास पडत असे.

५ बदललेला दृष्टिकोन

पण त्याच व्यक्तीने कळविल्याप्रमाणे आता तो काळ बदलला आहे. अनेकांचें लक्ष डॉक्टर केतकरांच्या लिखाणाकडे लागलें आहे. समाज, इतिहास, संस्कृति अशा विविध स्वरूपांच्या डॉक्टर केतकरांच्या लिखाणाचा सादर उल्लेख आणि त्यावर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चर्चा नियतकालिकांतून या तीन चार वर्षांपासून येऊं लागली आहे. नागपूर विश्व-विद्यालयाने तर सर्वांपुढे आघाडी मारली आहे. एम. ए. च्या परीक्षेकरिता डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, अभ्यासक्रमांत विशिष्ट ग्रंथकार म्हणून, अभ्यासाचा विषय ठेवण्यांत आला आहे. पुण्याचे एक होतकरू विद्वान श्री. द. न. गोखले हे ' डॉ. केतकर व्यक्ति आणि वाङ्मय ' यासंबंधीं एक विस्तृत ग्रंथ लिहावयाच्या प्रयत्नांत आहेत. त्याकरिता दोन वर्षांपासून ते साधनसामुग्री जमविण्याच्या उद्योगांत आहेत आणि डॉ. केतकरांच्या सांनिध्यांत आलेल्या व्यक्तींच्या गांठीभेटी घेत आहेत. मुंबईच्या प्रसिद्ध विदुषी कु. दुर्गाबाई भागवत एम्. ए. यांनी डॉ. केतकर आणि त्यांचें वाङ्मय यासंबंधीं निरनिराळ्या नियतकालिकांतून चिकित्सापूर्ण असें लिखाण दोन वर्षांपासून लिहावयास सुरवात केली आहे, आणि त्या डॉ. केतकर व्यक्ति आणि वाङ्मय याकडे महाराष्ट्राचें लक्ष प्रामुख्याने वेधण्याचें कार्य करीत आहेत. डॉ. केतकरांच्या समाजशास्त्रीय लिखाणांचा इंग्रजींत अनुवाद करून तो श्री. शीलवतीबाई यांच्या सहकार्याने पुस्तकरूपाने प्रसिद्ध केला आहे.

६. डॉ. केतकर प्रकाशन मंडळाची योजना

खास मुंबईंत डॉ. केतकर यांच्या लिखाणाचें प्रकाशन व्हावें, अशी उत्कट इच्छा असणारा कांहीं साक्षेपी विद्वानांचा एक वर्ग पुढे आला आहे. श्रीं. शीलवती-बाईंनीहि त्यांच्याशीं सहकार्याचा हात पुढे केला आहे. त्यांची एकमात्र इच्छा की, डॉ. केतकर यांनी एवढ्या परिश्रमाने तयार केलेले हे खंड प्रकाशित होऊन महा-राष्ट्रापुढे यावे. गेल्या नोव्हेंबरमध्ये प्राच्यविद्या परिषदेच्या मराठी विभागाचा अध्यक्ष म्हणून मला मुंबईला जाण्याचा प्रसंग आला होता. तेव्हा श्री. शीलवतीबाई आणि वरील गृहस्थांपैकी प्रमुख श्री. न. म. केळकर आर्टिस्ट आणि श्री. मंगेशराव कुळकर्णी यांची माझी बैठक झाली. त्या वेळीं ठरलें की, डॉ. केतकरांचे वरील दोन ग्रंथ व याशिवाय त्यांचें अप्रसिद्ध असलेलें इतर लिखाण आणि पूर्वी प्रसिद्ध झालेल्या आणि आता ज्यांच्या प्रति बाजारांत मिळत नाहीत, त्या प्रसिद्ध करण्याकरिता ४८ हजार रुपये भांडवलाची एक प्रायव्हेट लिमिटेड कंपनी काढावी. मध्यप्रांत वऱ्हाडांत डॉ. केतकरांचे श्री. पी. वाय्. देशपांडे, डॉ. कोलते इत्यादि अनेक स्नेही, ऋणानुबंधी शेकडोंनी आहेत, त्यांची या कार्यास सक्रिय सहानुभूति आहे आणि त्यांच्या वजनाने आणि परिश्रमाने या कार्याच्या पूर्तिकरिता वऱ्हाडमध्यप्रांत हातभार लावील अशी त्या मंडळीला मी हमी दिली आहे. श्री. केळकर, बॅरिस्टर ओक, श्री. मंगेशराव कुळकर्णी यांच्या परिश्रमाने लवकरच वरील कंपनीची मुहूर्तमेढ रोवण्यांत येईल.

७. कार्यास प्रारंभ

मला आठच दिवसांपूर्वी श्री. शीलवतीबाई केतकर यांचें पत्र आलें की, मुंबईचे मेअर श्री. स. का. पाटील यांनी या प्रकाशनकार्याकरिता ५ हजार रुपये द्यावयाचें जाहीर केलें आहे. श्री. मंगेशराव कुळकर्णी यांनी २ हजार आणि आणखी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तिघेमिळून तीन हजार, एकूण दहा हजारांची सोय झाली आहे. मुंबई, पुणें, प्रमुख महाराष्ट्रहि डॉ. केतकरांच्या वाङ्मयांतील थोरवीसंबधाने जाणून आहे. तो या आरब्ध कार्यास सहानुभूतीने सक्रिय उचलून धरील. डॉ. केतकरांचा जन्मभू विदर्भ पूर्वी झालें तें झालें, पण डॉ. केतकरांच्या उपेक्षित ग्रंथांची आता हेळसांड क्षणभरहि सहन करणार नाही, असा मला विश्वास वाटतो. प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला ४९ च्या वर, कायद्याप्रमाणे, भागीदार होतां येत नाही, म्हणून भांडवलाचा प्रत्येक हिस्सा एक हजार रुपयांच्या पेक्षा कमी ठेवतां येत नाही. त्यामुळे विदर्भासह महाराष्ट्रांतून थाकरता १००० रुपयांचा एक शेअर घेणारे जास्तींत जास्त ४९ हिस्सेदार पाहिजेत. डॉ. केतकरांनी मराठी वाङ्मयाकारिता जें कांही त्यागपूर्वक मोलाचें असें कार्य केलें, त्या कार्याचें महत्त्व ध्यानांत घेऊन ही प्रकाशनाची योजना यशस्वी करतील, अशी उत्कट इच्छा प्रगट करून हा लेख पूर्ण करितों.

संसार

★

डोंगर दिसला दुरुनि साजरा
चढतांना परि जीव घाबरा ॥ धृ. ॥
संगें घेउनि कणखर सोबत ।
चालूं लागले हासत नाचत ।
आशा, कांक्षा, हौस मनांतिल
फुलवितिं माझ्या उरा ॥ १ ॥
कंटक कितीक पायीं रुतले ।
अवघड उभार चढणीवरले ।
सहानुभूती, गाढ प्रीतिचा
परंतु होता मला आसरा ॥ २ ॥
येतां चढुनी माथ्यावरती ।
घर्मबिन्दु कष्टाचे विरती ।
संतोषाचा मंद सुशीतल
झुळुझुळु आला हासत वारा ॥ ३ ॥

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रसग्रहण

टागोरांचा "गार्डनर" : एक दृष्टिकोन

मनोहर देशपांडे

★

कविवर्य रवींद्रनाथ टागोरांचा 'गार्डनर' काव्यसंग्रह मला फार आवडतो. माझ्याप्रमाणेच अनेकजणांना त्यांतील भावमधुर गीतांनी चटका लावलेला मला माहीत आहे. 'गार्डनर' मी अनेकदा वाचला आहे आणि त्यांतील गीतं वाचीत असतांना 'गार्डनर' चं एक वैशिष्ट्य माझ्या सारखं लक्षांत येत होतं. आज इथं तें वैशिष्ट्य सांगत असतांना 'गार्डनर' वाचून एका रसिक (!) मनांत कोणकोणतीं आंदोलनं उठलीं याचा एक आलेख फक्त मी आपणापुढे ठेवणार आहे.

'गार्डनर'मध्ये बहुतेक सर्व प्रेमगीतांचा भरणा आहे. पार्थिवतेचा अजीबात त्याग न केलेल्या पण एका उच्च अध्यात्मिक पातळीवरून सौंदर्याचं रसिकतेनं अवलोकन आणि ग्रहण करणाऱ्या एका तरुण मनाचं संस्कारक्षम चित्रण या प्रेमगीतांतून केलेलं आढळतं असं म्हटल्यास वावगं होणार नाही. जीवनाच्या धकाधकीपासून अगदी दूर एकांतवासांत दिवस कंठणाऱ्या प्रेमी आत्म्याचे सूरहि अनेकदा ठिकठिकाणी ऐकूं येतात. एखाद्या सुंदर रेशमी वसनावर वेलबुट्टी काढलेली असावी तसं या गीतांतील प्रेमाचं चित्रण वाटतं! बहुतेक गीतांतून ठिकठिकाणी विखुरलेली चंद्र, तारे, स्वप्नं, दवबिंदू इत्यादि उपमेयं आणि उपमानं माझ्या विधानाला दुजोरा देतील!

पण असं असलं तरी जें कांही रेखाटन या भावगीतांतून केलं आहे तें खरोखरच अपूर्व आहे! हृदयाच्या तारा न् तारा इतक्या सूक्ष्मपणें अन् नाजुकपणें छेडणं म्हणजे खरोखरच तें एका महान् संवादी मनालाच शक्य! 'तुझ्या नि माझ्यामधील प्रेमभावना म्हणजे एखाद्या भावगीतासारखी सरळ आणि स्वच्छ आहे' अशा पालुपदाचं एक गीत आहे. त्याची सुरवात आजमितीला कोणत्याहि एखाद्या भावनाप्रधान (sentimental) गीतासारखी वाटेल. "Hands cling to hands and eyes linger on eyes: thus begins the record of our hearts." कालिदासाच्या दुष्यंत–शकुंतलेपासून आणि शेक्सपीयरच्या रोमिओ–ज्यूलिएटपासून तों अगदी आधुनिक नायकनायिकेच्या बाबतींतला हा पुरातन अनुभव— एक सनातन संकेत आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पण टागोरांची जादू आहे ती याच पुरातन संकेतांतून आणि अनुभूतींतून मानवी हृदयाचं स्पंदन एका अद्भुत कुशलतेनं रंगविण्यांत ! नेहमीचाच अनुभव, प्रेमांतली तीच ती आर्तता आणि माधुरी ! पण एखाद्या सुंदर स्थिरचित्राप्रमाणे तो अनुभव जेव्हा टागोरांची लेखणी चित्रित करते तेव्हा भावनांचा उल्हास आणि पुन्हःप्रत्ययाची माधुरी अनुभवाला येऊन मन सुखदभ्रमांत बुडून जातं. एखाद्या भावगीतासारखं सुंदर नी सरळ हें प्रेम असलं तरी पाठशिवणीच्या खेळांतली गंमत आणि छाया-प्रकाशाची सुरम्यता यांत असतेच !

" It is a game of giving and withholding, revealing and screening again; some smiles and some little shyness, and some sweet useless struggles. "

या प्रेमांत अनंताची आस नाही, अशक्यतेची कास नाही, सुरम्यतेच्या पलि-कडच्या छायेची भीति नाही आणि अंधारांत चाचपडण्याचीहि भीति नाही ! आणि चालू आनंदाचा उपभोग आम्ही अतिरिक्त घेतलेला नाही की ज्यामुळे दुःखाची शिरशिरी हृदयांतून उठावी. कारण — कारण —

" This love between you and me is simple as a song."

टागोरांच्या या अत्यंत साध्या, सरळ नि स्पष्ट अशा गीतांचा विचार करावयास लागलं की आशयाचा महान् पर्वत त्यांतून उभा होतो. हा आशय म्हणजे एका साध्या, निर्व्याज हृदयाचा साक्षात्कार असतो— वेगवेगळ्या अर्थांची कोलांटउडी एखाद्या महान् तत्त्वज्ञानाचा आविष्कार असं कांहीहि नसतं! आणि या वैशिष्ट्यामुळेच मला वाटतं टागोरांचीं हीं गीतं अजरामर झालीं आहेत.

हें झालं टागोरांच्या एका गीतप्रकाराबद्दल ! पण फुलांच्या, तारकांच्या नी स्वप्नांच्या विश्वांतून बाहेर येऊन ' गार्डनर ' मधील अखेरीचीं गीतं पाहावींत तों एका नवीनच सौंदर्यानं नटलेलीं भावगीतं दृष्टीस पडतात ! प्रेमरज्जूंचं आवरण कवीला आता असह्य होऊं लागलेलं असतं. हस्तस्पर्शांत आणि नेत्रमीलनांत प्रीतीचा स्वर्ग पाहणाऱ्या कवीला आता अनंताची ओढ लागलेली असते. चिरजीवनांतील वांछिताची आवड ठेवून पार्थिवतेचा पसारा दूर सारावा अशी तीव्र इच्छा कवि-मनांत आता जागृत होऊं लागते. कवि तळमळून उद्गारतो,

' No more of this wine of kisses. '

बंधनांतून सुटण्याची केवढी ही धडपड. पण कशासाठी ?

' Free me from your spells, and give me back the manhood to offer you my freed heart. '

जीवनाच्या या प्रवासांत सौंदर्याचं रसग्रहण करीत मन वणवण हिंडलं ! फुलां-तून, स्वप्नांतून, तारकांतून आणि नेत्रपल्लवींतून, हस्तस्पर्शांतून, सुगंधांतून सौंदर्याचा साक्षात्कार झाला ! नैसर्गिक सौंदर्याच्या पार्श्वभूमीवर मानवी सौंदर्य मोहकतेनं,

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

याटानं उभं होतं. मन रितामित झालं होतं, पुलकित झालं होतं ! पण झरकन एक क्षण—अगदी एकच क्षण विजेसारखा विचाराच्या रूपानं मनोक्षितिजावर चमकून गेला आणि एका नवीन विश्वाचं दर्शन घडलं ! कुठं आहे तें सौंदर्य—तें मानवी सौंदर्य, तें निसर्गाचं सौंदर्य, तें अलौकिक सौंदर्य ! मन उंचावून, बाहू दूरवर पसरून पाहावं पण तें सौंदर्य आटोक्यांत येत नाही—कुठें आहे तें सौंदर्य !

'Where is it ? Who can strain the blue from the sky ?' (कसा काढावा नीलिमा नभाचा !)

I try to grasp the beauty ; it eludes me leaving only the body in my hands.'

('तिच्या लावण्या कवळण्या पहावें
तोंच त्यानें चुकवुनी मला जावें ।
करीं माझ्या वपु मात्र तिचें यावें !
म्हणुनि कंटाळुनि परत त्या फिरावें !)*

आणि अखेर मग मनाला जाणीव होते ती याच सत्याची की—

'How can the body touch the flower which only the spirit may touch ?

('स्पर्श आत्म्यानें मात्र ज्या करावा,
कसा कुसुमा त्या तनुस्पर्श व्हावा !') *

पार्थिवतेचं कलेवर फक्त हातांत पडलं आहे आणि आत्मिक सौंदर्य पाऱ्यासारखं उडून गेलं आहे हें केवढं शोकदायक—केवढं शोचनीय ! आणि एका महान् संवादी मनांत जेव्हा ह्या विचारानं कल्लोळ उठतो तेव्हा — महान् संवादी कविमनं एकाच प्रकारच्या तारांनी गुंफलेलीं असतात की काय हें मला माहीत नाही पण कँपाग्नाच्या मैदानावर आपल्या प्रियेसोबत बसला असतांना ब्राऊनिंगच्या मनांतहि याच विचारानं कल्लोळ उडविला होता. मीलनाची आंस मनांत प्रज्वलित आहे, प्रियेच्या नेत्रांनी पाहण्याची, आपल्या हृदयाचं स्पंदन तिच्या हृदयानं करण्याची आणि तिच्या आत्म्यांत आपलं आत्मार्पण करण्याची इच्छा हृदयांत धगधगत आहे. पण मीलनाचा एखादा क्षण चमकतो न चमकतो तोंच नाहीसा होतो. ('Then the good minute goes')

पण कां ? कां असं ? कवीच्या वाटेला अखेर—

Infinite passion, and the pain
Of finite hearts that yearn

हाच अनुभव यावा ना !

---

* कवि माधव

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पूर्वेकडील संस्कृतींत वाढलेल्या टागोरांना या अनुभूतींची जाणीव पश्चिमकडील ब्राऊनिंगपेक्षा स्पष्टतर आणि तीव्रतर आहे. अर्थात् हा दोन संस्कृतींतला फरक आहे—दोन कविमनांच्या उत्कटतेंतला नव्हे! पण विस्मयजनक गोष्ट ही की, प्रादेशिक सीमा ओलांडून, सांस्कृतिक फरक अनुल्लेखून दोन दूरदूरचे भिन्न कवि एकाच अनुभूतींचा साक्षात्कार नोंदून ठेवतात! चारी बाजूंनी वाहत येणाऱ्या नद्यांचे प्रवाह अखेर समुद्राला मिळतात. तसा चिरंतन सत्याचा आविष्कार चोहोबाजूंनी एका अद्भुत साम्यतेनं आणि जुळणीनं होत असतो हेंच खरं!

टागोरांचं 'गार्डनर' तिसऱ्यांदा मी वाचलं! आणि प्रथमपासून मी जी गोष्ट सुचविण्याचा प्रयत्न करतो आहे त्याच गोष्टीचा अनुभव मी माझ्या त्या तृतीयवाचनाचे वेळीं घेतला. आतापर्यंत हें वेगवेगळ्या कवितांचं विवेचन करतांना मुद्दामच थोडासा एकांगीपणा पत्करण्यांत आला होता. हेतु एवढाच की, मला जें सांगायचं आहे तें स्पष्टपणें सांगितलं जावं. तेव्हा टागोरांच्या 'गार्डनर' मधील बहुतेक सर्व कवितांतून दोन प्रवाहांचं मोठं बेमालूम मिश्रण झालेलं आढळतं. सोईसाठी मी एकाला पार्थिवतेचा प्रवाह आणि दुसऱ्याला आत्मिकतेचा प्रवाह म्हणतों. निःसंकोचपणें असं म्हणतां येईल की, छायाप्रकाशाप्रमाणे स्थायीभूत असणाऱ्या या दोन प्रवाहांचं मिश्रण जितक्या कलात्मकतेनं, सुंदरतेनं आणि भावपूर्णतेनं टागोरांच्या भावकवितांतून आढळतं तितकं दुसऱ्या कवींच्या काव्यांतून क्वचितच आढळेल! एका संवेदनाक्षम आणि प्रतिभावान् मनाच्या दोलायमान मनःस्थितीचा आभास आणि निरासमय कलात्मक आविष्कार म्हणजे टागोरांचीं 'गार्डनर' मधील भावगीतं होत! आत्मिक मूल्यांचा आविष्कार आणि त्यांचा विजय टागोरांनी नेहमीच मान्य केलेला आहे आणि 'गार्डनर' मधील गीतांत त्यांची तीच अनुभूति क्षणोक्षणी प्रतीत होते. पार्थिवतेचा आणि आत्मिकतेचा—असे हे दोन्ही प्रवाह जोडीजोडीनं वाहात असतात. कधीकधी पार्थिवतेचा आविष्कार अधिक उत्कटतेनं स्पष्टतर होतांना दिसतो पण अखेर आत्मिक मूल्यांचा जय होतो. मनाचं पारडं आत्मिक सौंदर्याकडे हिरीरीनं वळतं. पार्थिव सौंदर्यांच्या रज्जूंत गुंतलेलं मन हळूच ते धागे उकलूं लागतं आणि सहजोद्गारानं उत्कटतेनं म्हणतं—

'Then finish the last Song, and let us leave.'

पण पार्थिवतेला असा अंत असला तरी आत्मिक सौंदर्यानं बिनटलेल्या टागोरांच्या भावकवितेला अंत नाही. ती चिरंतन आहे! टागोरांचा गार्डनर चिरंतन आहे! टागोर चिरंतन आहेत!

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आमची मित्रमंडळी :

भवानीशंकर श्रीधर पंडित—

ना. रा. शेंडे

चारपांच वर्षांपूर्वीची गोष्ट. एकदा मी घाईघाईने घरीं परत आलों. दारांत पाऊल ठेवल्याबरोबर माजघरांतील खाटेवर एक जाडीजुडी, उंच बांध्याची, गोऱ्या वर्णाची मूर्ति स्थानापन्न झालेली दिसली. मला पाहतांच "माफ करा. तुम्हाला त्रास द्यायला मी आलों आहे. तेंह अतिशय महत्त्वाचें काम आहे. तुम्ही नाही म्हणणार नाही अशी आशा आहे मला. तुम्हीच करूं शकता तें काम."

"कोणतें ? शक्य असलें तर तें अवश्य करीन." "मला रात्रीची शाळा चालवावयाची आहे. अन् ती सुद्धा दलित वस्तींत. हें काम मोठें अवघड आहे. दिवसभर काबाडकष्ट करणारे लोक कितपत शाळेंत येतील याबद्दल शंका आहे. या बाबतींत तुम्ही मला मदत केली पाहिजे."

मी थोडासा विचारांत पडलों. तेव्हा ते म्हणाले 'तुम्ही मनावर घेतल की सर्व कांही ठीक जमेल.' मीं विनम्रभावें म्हणालों, 'हें तर माझें आवडतें काम आहे. तें मी अवश्य करीन. आपण निश्चित असा.'

चार आठ दिवसांची मी मुदत मागितली. आम्ही दोघे गड्डीगोदाम ह्या दलित वस्तींत गेलों. मनाप्रमाणे सर्व ठाकठिक झालें आणि प्राध्यापकसाहेब ह्या दलित जनतेला साक्षर करण्यास परिश्रम घेऊं लागले. ते म्हणाले, "माणसाच्या खऱ्या शक्तींचा कस ह्या दीनदुबळ्या लोकांच्या सेवेंत लागतो. आत्तांच मी बाहेरून येतों आहे. रस्त्याने एक ट्रक गेली. तींत राबणारे पुरुषहि होते अन् स्त्रियांहि होत्या. केवढ्या खेळीमेळीने ते गात जात होते ! कांही मूठभर स्त्रियांना समानतेचे हक्क हवे आहेत असें वाटतें ना ! त्यांनी ह्या लोकांच्याकडे लक्ष पुरविलें तर हा प्रश्नच उद्‌भवत नाही. खेड्यापाड्यांत तरी काय स्त्री-पुरुष एकत्रच काम करतात अन् बरोबरीच्या नात्याने वागतात. ते अडाणी किंवा अशिक्षित असतात येवढेंच ! हा प्रश्न मात्र कोणी धडाडीने सोडवूं इच्छित नाही हें नवलच नाही काय ?"

हे महाराष्ट्रांतील प्रख्यात कवि व साहित्यिक श्री. भवानीशंकर श्रीधर पंडित !

प्रा. पंडितांचा जन्म दक्षिणेंत वाई येथे २८ एप्रिल १९०६ रोजीं झाला. पण
 त्यांचें संपूर्ण बालपण मात्र उत्तरेंत अजमेरला गेलें. यू. पी. हायस्कूल बोर्डाची परीक्षा

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उत्तीर्ण झाल्यावर कॉलेजच्या शिक्षणासाठी ते नागपूरला आले आणि अि. स. १९३१ साली मराठी विषय घेऊन ते उत्तम रीतीने अेम्. अे. झाले. त्यानंतर अेक वर्ष त्यांनी नागपूर येथील सरकारी पटवर्धन हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी केली. पण पुढे १९३३ साली ते हिस्लॉप कॉलेजांत मराठीचे प्राध्यापक झाले. दहा वर्षे ह्या खाजगी मिशनरी कॉलेजांत अध्यापनाचें काम केल्यावर ते १९४५ साली मॉरिस कॉलेजांत म्हणजे आजच्या नागपूर महाविद्यालयांत आले. दोन्ही कॉलेजांत त्यांचा उत्तम शिक्षक म्हणून लौकिक झाला.

त्यांच्या लिखाणाला वयाच्या तेराव्या चौदाव्या वर्षी सुरवात झाली. तीहि अेका हिंदी कवितेपासून. त्यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण हिंदींतूनच झाल्यामुळे त्यांना हिंदी साहित्याची गोडी लागली. त्यांना उत्कृष्ट हिंदी बोलतां येते व लिहितां येते. अजमेरला शिक्षण घेत असतांनाच त्यांचा कविश्रेष्ठ के. भा. रा. तांबे यांचेशीं परिचय झाला आणि त्यांच्या मार्गदर्शनानेच पंडित आपल्या आजपर्यंतच्या आयुष्यांत चिरंजीव काव्य निर्माण करूं शकले. त्यांचा ' पिचलेला पावा ' हा पहिला काव्यसंग्रह गाजला. या संग्रहांतील काव्यांत पंडितांचें उदात्त, निर्मळ व कनवाळू हृदय, सूक्ष्म सौंदर्यदृष्टि आणि प्रेरक विचारधारा स्पष्टपणें आढळून येते. ' पिचलेला पावा ' ह्या काव्यसंग्रहानंतर (२) बीजेची कोर (३) चवथीचा चांद (४) अष्टमीचा चंद्र आणि (५) पौर्णिमेचें चांदणें हे शिशुगीतांचे संग्रह बरेच लोकप्रिय झालेत. बालमनाचा थांग घेऊन त्यांना आनंद आणि बोध प्राप्त होईल अशी दक्षता पंडितांनी घेतली आहे. बालवाङ्मयाचे ते आद्यप्रणेते आहेत असें म्हणणें अत्युक्त होणार नाही. याशिवाय त्यांच्या कविता (१) काव्यकौमुदी (२) महाराष्ट्र शारदा (३) विदर्भवीणा (४) बालशारदा (५) महाराष्ट्र रसवंती (६) सुगी (७) स्वस्तिक आदि काव्यसंग्रहांत समाविष्ट झाल्या आहेत. क्रमिक पुस्तकांतूनहि त्यांच्या रसाळ कविता बहुधा वाचावयास मिळतात. आणि आता तर ' उन्मेष व उद्रेक ' हा त्यांचा आणखी एक मोठा काव्यसंग्रह त्यांच्या प्रतिभेची साक्ष म्हणून त्यांच्या काव्य- मळ्यांत शोभा देत आहे.

काव्यनिर्मिति एवढेंच काम प्रा. पंडितांनी केलें नाही, तर त्यांनी कवि आणि काव्य ह्यावर मार्मिक निबंध लिहिले आहेत. (१) जुनी आणि नवी मराठी कविता (२) भावगीतांचीं भावंडें (३) कविसंमेलन व कवितावाचन (४) ओवीचा विकास व नियमन (५) काळेले यांची भावपूर्णा (६) सावरकर काव्य समालोचन (७) कवि माधव ज्यूलियन यांचें स्वप्नरंजन (८) आगरकर व गडकरी (९) कवयित्री टिळक (१०) विद्वत्व आणि कवित्व (११) केशवसुतांच्या कांहीं कवितांचे उगम (१२) कवयित्रींची परंपरा (१३) रघुनाथ पंडित (१४) मुक्तछंद कसा असावा (१५) आधुनिक कवी व गूढगुंजन (१६) बोबडे यांची रसवंती (१७) ओवीचें दुहेरी स्वरूप (१८) सावरकरांची कविता (१९) कुसुमाकर (२०) कथाकाव्य (२१) नाट्यकाव्य इ. त्यांचे अनेक निबंध गाजले आहेत. कविवर्य के. भा. रा. तांबे यांवर त्यांची अनन्य निष्ठा असल्याने त्यांनी त्यांच्यावर विविध प्रकारें लिहिलें आहे. १. तांब्यांचें आलोचन व मार्गदर्शन २ कविवर्य तांबे यांच्या कवितेचें विशेष ३. कविवर्य तांबे यांचे काव्यविषय ४. कविवर्य तांबे यांच्या सान्निध्यांत असे लेख लिहून तांब्यांच्याबद्दल विशेष माहिती उपलब्ध करून ठेवली आहे. अिंग्रजी राजवटींतील मराठी कविता या विषयावरील व्यासंगपूर्ण असे दहा लेखांक आणि मराठी कवितेची

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अिंग्रजी राजवट हे लेख तर त्यांच्या चिकित्सक बुद्धीची व अविश्रांत परिश्रमाची साक्ष देतात. ह्या वाङ्मयाव्यतिरिक्त पंडितांनी संतवाङ्मयाचाहि कसोशीने अभ्यास केला आहे. (१) तुकाराम व कबीर (२) विद्यापति व चंडिदास (३) संत सेनाजी (४) महीपति (५) प्रियादास व नाथाजी (६) अेकनाथांचें चरित्र व कार्य, हे त्यांचे लेख विशेष उल्लेखनीय आहेत. आपल्या मराठी मायबोलीबद्दल पंडितांना फार अभिमान आहे. हा अभिमान (१) दख्खनच्या वीरांचे हिंदुस्थानी भाट (२) प्रांतीयता (३) महाराष्ट्राचे अेकीकरण (४) महाराष्ट्रांत मराठीचें वर्चस्व (५) महाराष्ट्रांत मराठीचाच वरचष्मा हवा, अि. विचारपरिपूर्ण लेखांत स्पष्ट होतो. याशिवाय (१) निरक्षरांचें वाङ्मय (२) विनोदी चुटका (३) रंगमंच व चित्रपट (४) अद्‌भुत आणि अतिशयोक्ति (५) मुक्तक (६) भावना व भाषा (७) प्रतिभा व आरंभ (८) बाळबोल (९) भावगीत असे कितीतरी लेख लिहून त्यांनी मराठी वाङ्मयावरील आपली चोखंदळ भक्ति व्यक्त केली आहे.

मराठी प्रमाणेच प्रा. पंडितांचा हिंदी वाङ्मयाचा अभ्यास बराच आहे. मराठींतून त्यांनी हिंदी साहित्याचा व साहित्यिकांचा परामर्ष घेतला आहे. अितकेंच नव्हे तर मैथिलीशरण, कबीर, पंत, सूर आदि हिंदी कवि आणि अिक्बाल, अकबर, हाफिज आदि उर्दू कवींशीं त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. यावरून वाङ्मय-क्षेत्रांतील त्यांचें जग केवढें विस्तृत आहे याची कल्पना येईल.

त्यांची स्मरणशक्ति अद्‌भुत आहे आणि पाठांतर तर इतकें आहे कीं कोणी केव्हांहि वाङ्मयक्षेत्रांतील कसलाहि प्रश्न विचारला तरी सर्व तयारीनिशी सुसज्जच आढळतील. ओव्यांच्या ओव्या, अभंगचे अभंग, काव्येंचीं काव्यें अगदी तोंडपाठ अन् पद्धतशीर ऐकून घ्या. त्यांच्या माहितींत जराहि उणीव भासणार नाही. ते विनोदी आणि रसिक आहेत. खुमासदार वैचारिक कोट्या करण्यांत तर त्यांचा हातखंडा आहे. तुम्ही ज्या भाषेंत ज्या ढंगाने उत्तर द्याल, अगदी त्या भाषेंत त्याच ढंगाने पण उच्च पातळीवरून ते तुम्हाला खचित नामोहरण करतील. परिणामकारक वक्तृत्व ही त्यांची दुसरी कला आहे. ठाशीव शब्दांत श्रोतृवर्गाच्या अंतःकरणाचा ते ठाव घेतात. वादाचा प्रश्न निघाला की मग काय ! गेल्या दीडदोन वर्षांपूर्वी येथील राजाराम वाचनालयांत सिने-दिग्दर्शक श्री. पार्श्वनाथ अळतेकर यांचें केशव-सुतांच्या कवितांचे साभियन वाचन झालें. कवि अनील हे ह्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. पण कार्यक्रम संपल्यावर केशवसुतांवरून असाच थोडा वाद उपस्थित झाला. एका बाजूला अनिल व सौ. कुसुमावती देशपांडे आणि दुसऱ्या बाजूला कवि पंडित. हा वाद खूप रंगला. पंडितांना कुणीतरी वाद न घालण्याबद्दल म्हणताच ते एकदम म्हणाले—"आक्षेपांचें निरसन जेव्हांचे तेव्हांच व्हायला पाहिजे. सर्व कांही निमूटपणें ऐकून घ्यायचें ! छे ! छे ! हें नाही जमायचें मला ! "

परवा पुरोगामी वाङ्मयासंबंधीं प्रश्न निघाला तेव्हा ते म्हणाले " आजकाल पुरोगामी वाङ्मयाला बराच ऊत आला आहे. पण छचोरपणा म्हणजे कांही पुरो-गामी वाङ्मय नव्हे. अथवा वाङ्मयांत अधूनमधून इंग्रजीचें शब्द घुसडल्याने कांही पुरोगामित्व सिद्ध होत नाही. ज्या वाङ्मयाला बीभत्स स्वरूप येतें तें वाङ्मयच नव्हे. मर्ढेकरांच्या कांही कविता बऱ्या आहेत तर कांही अगदीच क्षीण आहेत. पण एवढ्याच भागाचें बरेचसे कवि अनुकरण करून पुरोगामी वाङ्मयाचा उदोउदो करतात. आजच्या स्थितीचें चित्रण उच्च पातळीवरून करून जे जनतेची विचारशक्ति

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अधिक प्रगल्भ व उपकारी करूं पाहतात त्यांचेंच वाङ्मय खरें पुरोगामी वाङ्मय आहे. समाजाला कांही नीतीनियमन आहेत की नाही ! परंतु हे सारें बाजूला सारून अगदी स्वैरपणें कोणी कांही आलाप करूं लागला कीं मग मन विटून जातें. तसें पाहिलें तर आपलें जुनें वाङ्मय फार मोलाचें आहे. तें आजहि नवीनच व स्फूर्तिदायक वाटतें."

"पण जुनें वाङ्मय भारदस्त व बोजड नाही कां वाटत तुम्हाला ?"

"हे खरं आहे. परंतु त्याच्या वाचनाने भाषा कशी तयार होते ! जुनें वाङ्मय वाचायला बसला की माणूस दिपून जातो आणि माहितीचा भरपूर संच लाभतो हे काय कमी आहे ! जुनें वाङ्मय म्हणजे आपल्या पिढ्यांना लाभलेलें मोठें घन आहे. ह्या धनाबरच आज आपण गर्वाने कांही सांगू शकतो."

आणि मग, पंडितांनी जुन्या लेखकांच्या परिश्रमाचे अनेक दाखले देऊन अलीकडील कांही लेखकांच्या वाङ्मयाचे मासले समोर ठेवले. "अेवढे कशाला ? हा अेक ताजा नमुनाच पाहा." असें म्हणत त्यांनी नुकताच प्रसिद्ध झालेला काव्यसंग्रह काढून मला तो संपूर्ण वाचून दाखविला. आणि म्हणाले, "ह्या काव्यांत तडफदारपणा आहे. कल्पनाविलास आहे. थोडी भाषाहि आहे परंतु जुन्या वाङ्मयांतील, किंवा तेंहि सोडा, कालच्या काव्यांतील थोडा तरी प्रभावीपणा तुम्हाला आढळतो कां ? अनुभूतीची जराहि जाणीव नसल्याने किंवा जुन्या वाङ्मयाचा जराहि अभ्यास नसल्याने ह्या कवयत्रीने केवढी गंमत करून ठेवली आहे !"

प्रा. पंडितांची वृत्ति खेळाडू, आणि स्वभाव शांत, स्नेहशील आहे. अहंकार किंवा आढ्यता यांच्यांत नाही. कुणीहि त्यांच्याकडे जावें आणि हवें तें काम द्यावें. शक्य ती मदत करण्यास ते सदैव तत्पर असतात. कितीतरी लेखकांनी त्यांच्या सौजन्याचा फायदा घेतला आहे व घेत आहेत.

नागपुरांतील पंडितांचें वास्तव्य शहरापासून अगदी दूर, म्हणजे दोन-तीन मैलांवर अंबाझरी रोडवरील श्रद्धानंदनगरांत आहे. अगदी मोकळ्या जागीं विलसत असलेली त्यांची टुमदार बंगली अशा कांही रम्य वातावरणांत आहे की तेथे जाणाऱ्या व्यक्तीचा श्रमपरिहार होऊन ती या प्रशांत वातावरणांत सहज रममाण व्हावी. शहरांतून घरी परतल्यावर पंडित आपल्या अभ्यासिकेंत सारखें वाचन आणि लेखन करण्यांत आपला वेळ घालवितात. चुकूनमाकूनच कोणी त्यांच्याकडे जायचा. पण कोणी आलेच; मग तो ओळखीचा असो वा नसो ते त्याच्या आदरातिथ्यासाठी जातीने कष्ट घेतात. कॉलेजमधून आल्यावर त्यांना सायंकाळी वेळ मिळाला तर ते आपली दुचाकी घेऊन निघतात. ठराविक मित्र व राजाराम लायब्ररीची परिचित मंडळींशीं भेटगांठ घेतल्यावर आणि दिलखुलास गप्पागोष्टी झाल्यावर ते घरी परततात.

साधें संयमी जीवन, जीवनांतील बारिकसारीक गोष्टींबद्दल जिज्ञासा व आस्था, बहुश्रुतपणा, जीवनाची तळमळ, मानवतेवरील विश्वास, पडेल तें काम आनंदाने करायची प्रसादशील अंतःकरण प्रवृत्ति – आणि यामुळेच त्यांच्या काव्यांत, त्यांच्या साहित्यमीमांसेंत, त्यांच्या संभाषणांत, सरसता आलेली आहे. हरिजनांसाठी शाळा चालविणाऱ्या या कवीचें अंतःकरण जनताभिमुख आहे !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" श्री संत नामदेव "

ब. ना. एकबोटे (साहित्यविशारद)

★

महाविदर्भातील विद्वान प्राध्यापक श्री. कोलते यांनी युगवाणीच्या सेप्टेंबर महिन्याच्या अंकांत 'श्री संत नामदेव' हा वाचनीय लेख लिहिला आहे. डॉ. कोलते हे कवि, इतिहाससंशोधक आणि भाषापंडितहि आहेत. त्यांच्या लेखांत शंकास्थळें आहेत असें म्हणण्याचें धाष्टर्य करणें म्हणजे लहान तोंडीं मोठा घास घेण्यासारखें आहे. तरी पण विद्यार्थ्यांना कोणत्याहि प्रकारच्या शंका विचारण्याची मुभा असते या एकाच जाणिवेने चार ओळी लिहीत आहे.

नामदेवासंबंधीं यथार्थ लिखाण लिहितांना, ज्ञानेश्वराविषयी कांही विधानें केलीं आहेत तीं मला चिंत्य वाटतात. त्या विधानांचें अधिक स्पष्टीकरण त्यांच्या-सारख्याच अधिकारी पुरुषांकडून होण्याची आवश्यकता आहे.

प्रथमतः श्री संत नामदेवांचें अनन्य साधारणत्व वर्णन करतांना डॉ. कोलते यांनी वारकरी पंथाचा पाया ज्ञानदेवांनीं रचला हें खरें नाहीं असें म्हटलें आहे. श्री संत बहिणाबाईनी एका अभंगांत 'ज्ञानदेवें रचिला पाया' असें म्हटलें आहे तें अलंकारिक आहे. त्यामध्ये ऐतिहासिकता नाही. तरीपण ही रूढ समजूत होण्याचीं कारणेंहि या निमित्ताने विचारांत घेणें अवश्य आहे. ज्ञानेश्वरांच्या काळांत वारकरी पंथास भरघोस स्वरूप आलें हें लेखकाने लगेच पुढे म्हटलें आहे.

कोणत्याहि पंथास अथवा कार्यास डोळ्यांत भरण्यासारखें भरघोस स्वरूप प्राप्त होतें तेथूनच त्याचें उगमस्थान मानण्याची ऐतिहासिक नव्हे पण स्थूलपणाची एक सर्वसामान्य पद्धत आहे, हें मात्र आणखी एका उदाहरणानें सिद्ध करतां येण्यासारखें आहे. आर्यवंशाचें किंवा वैदिक संस्कृतीचें उगमस्थान कोणतें असें विचारतांच कोणीहि ऋग्वेदाकडे बोट दाखवील. ऋग्वेदांतील विचार, आचार व भाषा यांचा विचार करतां तें आमच्या वैदिक संस्कृतीचें उगमस्थान असूं शकत नाही. ऋग्वेदाचें परिणत स्वरूपच वेदपूर्वकालांतील आमच्या अस्तित्वाची साक्ष पटवितें. जुन्यांत जुनें आमचें सांस्कृतिक स्वरूप म्हणजे ऋग्वेद असें मानण्यांत येतें. ती आमची गंगोत्रि व तोच आमच्या वैदिक संस्कृतीचा पाया समजला जातो पण ऐतिहासिक दृष्ट्या हें खरें नाही.

समाजव्यवस्थेला एक विशिष्ट वळण देण्याचा जेव्हा पद्धतशीर प्रयत्न केला जातो तेव्हाचा क्षण हा पायासारखा समजावयास कांही हरकत नसावी. वारकरी पंथ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पूर्वी होता, पंढरपूरच्या विठोबाची प्रतिष्ठापना ज्ञानदेवापूर्वीच झाली होती व सामान्य जनांना सोपा असा नामस्मरणाचा भजनमार्ग रूढ झाला होता. त्याच मार्गातील श्री संत नामदेव हे महान् आर्त भक्त होते ही गोष्ट निर्विवाद आहे. पण कोणत्याहि पंथाची बैठक शास्त्रीय पद्धतीने तात्त्विक भूमिकेवरून निश्चित झाल्याशिवाय तिला स्थैर्य व चिरंतनत्व प्राप्त होऊं शकत नाही. तें कार्य ज्ञानेश्वर महाराजांनी केलें. ज्ञानयुक्त भक्तीचा महिमा ज्ञानेश्वरांनी आपल्या ग्रंथांतून प्रतिपादन केला हें डॉक्टरांना मान्यच आहे. फक्त त्याला महत्त्व किती द्यावयाचें या विषयीं त्यांचा दृष्टिकोण वेगळा असावा असें वाटतें. मला या मुद्यासंबंधीं एवढेंच म्हणावयाचें आहे की ज्ञानयुक्त भक्तीचें गीताप्रणीत तत्त्व ज्ञानेश्वरांनी पद्धतशीर रीतीने मांडलें म्हणूनच भक्तिमार्गाचा शास्त्रोक्त पाया घालण्याचें श्रेय तत्कालीन संतांनी त्यांना दिलें व तें त्यांचें करणें योग्य आहे. आर्त भक्तांची श्रेष्ठता कोणत्याहि प्रकारें कमी न लेखतां असें म्हणतां येईल की, कोणतीहि कल्पना वैचारिक क्षेत्रांत शास्त्रीय पद्धतीनें मान्य होणें ही महत्त्वाची कामगिरी असते व ती करणाराची थोरवी कधीच व कशानेहि बाधित होऊं शकत नाही. वारकरी पंथाला ज्ञानेश्वरकालांत जें भरघोस स्वरूप प्राप्त झालें तें ज्ञानेश्वरांमुळे नाही, श्री नामदेवांमुळे असें जें डॉक्टरांनी म्हटलें आहे तेंच माझें पहिलें शंकास्थान होय. मी हें कबूल करीन की, जनतासंपर्काचे योग्य अधिकारी श्री संत नामदेव व ज्ञानयुक्त भक्तीचे शास्त्रीय रीतीने मंडन करणारे ज्ञानदेव या उभयतांच्या समन्वयाने वारकरी पंथाची वाढ झाली व त्या पंथास भरघोस स्वरूप प्राप्त झालें हें निःसंशय खरें आहे.

ज्ञानदेवांच्या ज्ञानी भक्ताने वर्णव्यवस्था व विधिनिषेध सर्व पाळलें पाहिजेत असा त्यांचा आग्रह आहे. असें ज्ञानेश्वरांसंबंधीं केलेलें विधान सत्य आहे. पण विद्वान प्राध्यापकांनी हें विधान त्यांची वैय्यर्थता दर्शविण्याच्या दृष्टीने केलें असावें असें तें वाचित असतांना वाटतें. ज्ञानेश्वर महाराज हे एक ज्ञानी व द्रष्टे पुरुष होते. अशा प्रकारच्या पुरुषावर फार मोठी जबाबदारी असते. अस्तित्वांत असलेल्या जुन्या संस्कारांचें पुनरुज्जीवन करावें किंवा नवा संस्कार यशस्वी रीतीने व पद्धतशीरपणें समाजाचें गळीं उतरवावा. हें करतां आलें नाही तर अस्तित्वांत असलेल्या समाजव्यवस्थेवर नुसती विध्वंसक टीका करून केवळ अव्यवस्थेची जबाबदारी स्वतःवर घेणें हें या महापुरुषाचें काम नव्हे. वैचारिक क्षेत्रांतील क्रांतिकारक श्री ज्ञानेश्वर महाराज आणि सामान्य जनतेंत नित्य वावरणारे नामदेव महाराज यांच्या परस्परसाह्यानेच समाजाचें मार्गदर्शन व संचालन होत असतें. हा विचार नित्य मनांत बाळगला म्हणजे ज्ञानेश्वर महाराज वर्णव्यवस्थेची व विधिनिषेधाची क्षिति कां बाळगीत असावेत याची संगती सहज लावतां येईल. आधुनिक काळांतील चटदिशीं आठवणारें लो. टिळकांचें प्रायश्चित्त प्रकरण हेंहि वरील सदरांत पडणारेंच आहे. तेव्हा जी गोष्ट निश्चयाने घडून आणावयाचा संकल्प हे महापुरुष करतात तो संकल्प प्राणपणाने सिद्धीस नेल्याशिवाय राहत नाहीत. ज्ञानेश्वरांनी केलेली विचारक्रांति सर्वमान्यच आहे. इतर सर्वच बाबतींत ढवळाढवळ करावयाची नाही, बुद्धिभेद होऊं द्यावयाचा नाही, स्वतःच्या वैयक्तिक जीवनावर होणाऱ्या आघातामुळे बंडखोरी करणें तर मुळीच उचित नव्हे असा दूरदर्शी विचार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज्या उदात्त भूमिकेवरून ज्ञानेश्वरांनी केला त्या थोर अंतःकरणाविषयी विपरीत भाव उत्पन्न होऊं नये, म्हणून वरीलप्रमाणे खुलासा करण्याचा मोह अनावर झाला.

'मोडकळीस आलेल्या ब्राह्मणधर्माची व तीर्थक्षेत्रादि व्रतांची प्रतिष्ठा पुन्हा स्थापन करण्याची ईर्षा बाळगणाऱ्या ज्ञानदेवांनी त्यांना परमेश्वरासमोर नेलें' या विधानांतील अर्थ मला न कळण्यासारखा आहे. डॉ. कोलते यांनी या लेखांत ब्राह्मण-धर्म हा शब्द दोन वेळां उपयोजिला आहे. हा शब्दप्रयोग कोणत्या अर्थाने वापरला हें लक्षांत येत नाही. ब्राह्मणधर्म असा वेगळा धर्महि नाही आणि पंथहि नाही; आणि अशा प्रकारच्या कोणत्याहि कार्याची ईर्षा त्यांना होती ही मान्य होण्यासारखी गोष्ट नाही. श्री ज्ञानदेवांचें जीवितकार्य काय होतें व तें किती भव्य रीतीने त्यांनी तडीस नेलें हें सर्वविश्रुत आहे. अल्पवयांत आपलें उदात्त आणि भव्य ध्येय सिद्धीस नेणाऱ्या या महापुरुषास कोणत्याहि क्षुद्र कार्याची ईर्षा होती असें मान्य करावयास माझ्यासारखा निराग्रही विद्यार्थी तरी कधीहि कबूल होणार नाही.

ज्ञानेश्वराबरोबर नामदेव तीर्थयात्रेस गेले पण त्या काळांत पांडुरंगाच्या वियोगामुळे त्यांना सुख लाभलें नाही ही गोष्ट खरी आहे पण तीर्थयात्रेचें प्रवासांतील अनुभवांच्या दृष्टीने महत्त्व आहे, पुण्याचे दृष्टीने नव्हे असें लेखकांनी पुढे म्हटलेंच आहे. नामदेवांना जी तीर्थ-यात्रा ज्ञानेश्वराने पांडुरंगाची परवानगी घेऊन घडविली ती पुण्यप्रद नसली तरी हितप्रद होती हें लेखक मान्यच करतात. तर मग मी असें म्हणेन की, ज्ञानेश्वरासारख्या ज्ञानी भक्ताने नामदेवांसारख्या महान् आर्त भक्ताला तीर्थयात्रा घडविली व प्रवासांतील अनु-भवाचा लाभ मिळवून दिला हें नामदेवांच्या भविष्यकालीन जीवनाचे दृष्टीने इष्टच झालें नाही काय ? असें असतां, नामदेवांना तीर्थयात्रेची आवश्यकता नव्हती व ज्ञाने-श्वरांना तीर्थक्षेत्रव्रतादिकांची प्रतिष्ठापना करावयाची होती वगैरे म्हणण्यांत फारसें औचित्य दिसत नाही. दुसरें असें की संत नामदेवांना पांडुरंगाचा वियोग असह्य झाला हा आर्त भक्तीचा प्रकार आणि अवस्था कोणती समजावयाची ! तीर्थयात्रेंत असतांना 'नामा म्हणे सोडा बाई। ज्ञानदेव सर्वा ठायीं'। ही जी नामदेवाची भावना वर्णन केली आहे त्या नामदेवांना पांडुरंगमय अंतःकरण झालेलें असतांना, एका विशिष्ट स्थळाचा व मूर्तीचा वियोग इतका कां जाणवावा !

ज्याअर्थी तो वियोग असह्य होत होता त्याअर्थी आर्त भक्तीची ही प्रथमा-वस्थाच म्हणावी लागेल. सर्वत्र पांडुरंगाची भावना दृढ झाल्यानंतर तेच नामदेव उत्तरेंत गेले व अनेक वर्षे राहून त्यांनी तेथे फार मोलाची अशी कामगिरी केली. त्यावेळीं त्यांना पंढरपूरच्या विठोबाचा वियोग असह्य झाला नाही याचा अर्थ त्यावेळीं त्यांचें ज्ञान आणि भक्ति प्रगल्भ दशेला पोचलेली होती. केवळ पांडुरंगाच्या पायाजवळ बसून नामस्मरण करीत राहणें ही ईश्वरभक्ति नव्हे हें ज्ञान नामदेवांच्या अंतःकरणांत दृढमूल झालें होतें व त्यामुळेंच पंजाबांत जाऊन त्यांना लोकोत्तर कार्य करतां आलें. तीर्थयात्रेंतील प्रवासांत आलेला अनुभवच त्यांना उत्तरेस जाण्यास कारणीभूत झाला हें तर विद्वान लेखकांनी मान्य केलें आहे; आणि त्यानंतर तीर्थास जाण्याची कोणास आवश्यकता होती व कोणास नव्हती हा वाद व्यर्थ ठरल्याशिवाय राहत नाही. या उभयतां संतांनी कोणी कोणास काय दिलें याबद्दल लेखकांचें म्हणणें विनयाने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मान्य करूनहि त्यांनी एकमेकांना जें दिलें घेतलें तें मजसारख्या पामरास कळणें दुरापास्त आहे एवढें प्रांजळपणाने कबूल केल्याशिवाय राहवत नाही.

तीर्थयात्रेचें महत्त्व लौकिकदृष्ट्या लेखकाने मान्य केलें. या प्रवासांतील अनुभव पुढे नामदेवांना उपयोगी पडला असेंहि म्हटलें. मात्र 'नामदेव ज्या अब्राह्मण वर्गातून पुढे आले होते त्यांच्या अध्यात्मिक व सामाजिक गरजा लक्षांत घेऊनच त्यांनी तीर्थक्षेत्रव्रताच्या स्पर्धेतून त्यांना सोडवण्याचा मार्ग स्वीकारला ' हें विधान करून पुन्हा लेखकाने शंकेस जागा करून दिली. तीर्थयात्रा करण्याचा हेतू बदलला असें पाहिजे तर म्हणा पण त्यायोगें घडणाऱ्या प्रवासाचें महत्त्व कसें कमी होणार हें समजत नाही. या अनुभवाचें अगोदर ज्ञानदेवाने ज्ञानेश्वरी लिहिल्यामुळे तिला अनुभवाची बैठक नाही असेंहि म्हणावयास लेखकांनी कमी केलें नाही हें आणखी एक नवें शंकास्थान ! ज्ञानेश्वरी हा ग्रंथ टीकाग्रंथ आहे. त्या टीकाग्रंथाचें जें महत्त्व आहे तें निरनिराळ्या कारणानें अनन्यसाधारण आहे. प्रवासांतील अनुभवाच्या अभावीं त्या ग्रंथास कमीपणा यावा किंवा उणीव रहावी असें म्हणण्याचें अथवा वाटण्याचें कांहीच प्रयोजन नाही. निरनिराळ्या भाषांचें परिशीलन करून तो टीकाग्रंथ लिहिला, मराठी भाषेंत लिहिला, मराठींत ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्याच्या ईर्षेने लिहिला, वारकरी पंथांतील आर्तभक्तांनी सहज मुखोद्गत करावा अशा काव्यमय व रसाळ भाषेंत लिहिला व लोकसंग्रहाचे दृष्टीने अवश्य म्हणून वारकऱ्यांत मिसळून, अल्पकाळ त्यांचें अग्रेसरत्व स्वीकारून, त्यांना तीर्थयात्रा घडवून व योगीमहायोगीजनांचा गर्वमद नाहीसा करून कृतकार्य झालेले ज्ञानेश्वर महाराज समाधानवृत्तीने समाविस्त झाले. त्यांचेसंबंधीं लेखांतून होणारा मजसारख्या अज्ञजनांचा गैरसमज दूर व्हावा या हेतूने हा अल्पसा प्रयत्न केला आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मानवाचें भवितव्य

मधुकर केशव शेटे; सागर विद्यापीठ.

★

मनुष्य एका दृष्टीने खरोखरच फार स्वार्थी आहे; त्याची दृष्टि संकुचित आहे. जे प्रश्न त्याच्या अगदी जवळच्या स्वार्थाशीं निगडीत झाले असतात त्यांच्याविषयी तो विचार करतो. ह्या मानवजातीचें पुढे काय होणार, तिचें भवितव्य काय, ह्या प्रश्नांविषयी विचार करायला ह्याला सवडच सांपडत नाही. आपल्याला पुरेसें अन्नवस्त्र मिळालें म्हणजे झालें. ह्या स्वार्थीपणामुळे पुढे येणारें संकट स्पष्ट असून सुद्धा ह्याची कोणीच दखल घेत नाही.

अगदी दूरचा विचार केला तर मानवजातीवर येणारें संकट स्पष्ट दिसतें. लोकसंख्येची अपरिमित वाढ होत आहे; दररोज सुमारें ५५००० मुलें जन्माला येतात. पण त्याच प्रमाणांत नैसर्गिक साधनांची वाढ होत नाही. निसर्गाची उत्पादक शक्ति मर्यादित आहे. म्हणूनच श्रमांचा व भांडवलाचा पुरवठा वाढला तरी अन्नवस्त्रादि जीवनोपयोगी पदार्थ तेवढ्या प्रमाणांत वाढत नाहीत. अर्थशास्त्राच्या ह्या अमर तत्त्वामुळे मानवाचें भवितव्य फारसें उज्ज्वल दिसत नाही.

लोकवस्तीच्या ह्या दाबामुळे, अगदी निकृष्ट जमिनीहि लागवडीखाली आणल्या जातात. झाडें तोडून शेती केल्यामुळे अनेक डोंगर उघडे पडले आहेत. पण ह्यापासून कितीसा निभाव लागणार ! निसर्गाने घातलेल्या मर्यादा फार तर आपण तात्पुरत्या दूर करूं शकूं, पण पुढे काय !

ह्या नैसर्गिक मर्यादांवर तोड म्हणून अनेक उपाय सुचविण्यांत येतात. पण त्यापैकी बरेचसे अग्राह्य आहेत. कृत्रिम पदार्थ तयार करणें हा एक मार्ग सुचवला जातो. पेट्रोलची टंचाई आहे ना ! मग कोळशापासून पेट्रोल तयार करा. साखरेचा पुरवठा कमी पडतो, करा लांकडाच्या भुशापासून साखर; शिवाय सॅकरिनची जोड तयारच आहे. नैसर्गिक रबर मिळत नाही, तर कृत्रिम रबर तयार करायचें. रेशमाचा पुरवठा कमी म्हणून रेयॉन, निलॉन सारखे तंतू बनवून वस्त्रें विणायचीं. पण ह्या मार्गांतला फोलपणा तेव्हाच दिसून येईल. कोळशापासून पेट्रोल करायचें म्हटलें तरीं कोळसा लागतोच. रेयॉनचीं वस्त्रें तयार करायला विशिष्ट झाडांच्या लांकडाचा रांधा हवाच. तेव्हा कृत्रिम पदार्थ करूं म्हटलें तरी हा प्रश्न सुटत नाही. कृत्रिम पदार्थ तयार करण्यासाठी सुद्धा निसर्गाला शरण जावेंच लागतें. शिवाय आणखी एक अडचण उपस्थित होते. आज कोळसा स्वस्त म्हणून कोळशापासून पेट्रोल तयार करतात. उद्या कोळशाचा सांठा कमी झाल्यावर मग काय करणार !

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कोळसा महाग झाल्यावर त्यापासून पेट्रोल तयार करणें कसें परवडणार ? तेव्हा कृत्रिम पदार्थांचा उपयोग करूं म्हटलें तरी त्यांचाहि साठा केव्हा तरी संपणारच. पुढे काय करणार ?

युद्धांची इष्टानिष्टता

युद्धामुळे लोकसंख्येचा नाश होतो. अशी लोकसंख्या कमी झाली म्हणजे नैसर्गिक पदार्थांवर पडणारा लोकसंख्येचा दाब कमी होतो. म्हणजेच युद्धांमुळे हा प्रश्न आपोआप सोडवला जातो. तेव्हा युद्धें इष्ट आहेत असें कांही लोक म्हणतात. किंबहुना युद्धाच्या द्वारें निसर्ग लोकसंख्या मर्यादित ठेवतो असें त्यांचें मत आहे. (सुप्रसिद्ध अर्थशास्त्री–व लोकसंख्येच्या सिद्धांताचा जनक—मालथस ह्याचेंहि मत असेंच होतें.) पण हा समज चुकीचा आहे. निसर्ग हा प्रश्न सोडवतो असें म्हणणें म्हणजे निसर्गाला शरणागति लिहून देणें होय. मनुष्याच्या असहायतेची ही कबूली आहे.

युद्धांमुळे लोकसंख्या घटते हा थोडासा फायदा आहे खरा. पण ह्या लाभा-बरोबर इतकी हानि पत्करावी लागते की शेवटी गोळाबेरीज होऊन तोटाच पदरीं पडतो. शिवाय जागतिक लोकसंख्या जमेस धरली असतां युद्धामुळे आपल्याला वाटतें तितकी घट होत नाही. सुमारें २००–२२५ कोटि लोकसंख्या असलेल्या जगांतून युद्धामुळे जर १ कोटि लोक नाहिसे झाले तर फारसा फरक पडणार नाही. गेल्या युद्धांत जे अमेरिकन लोक मेले त्यांपेक्षा जास्त लोक त्याच अवधींत अमेरिकेंत केवळ मोटारअपघातांत मृत्यु पावले. म्हणजेच युद्धामुळे होणारी मनुष्यहानी भूमीवरचा दाब हलका करण्यास असमर्थ असते असें म्हणण्यास हरकत नाही.

या प्रश्नाला आणखी एक बाजू आहे. युद्धामुळे नैसर्गिक साधनांची जी हानि होते ती कल्पनातीत असते. शत्रूच्या मालाचा, कारखान्यांचा, वाहतुकीच्या साधनांचा पद्धतशीर विध्वंस केला जातो. पिकें जाळलीं जातात. अन्नधान्याचे साठे निरुपयोगी करण्यांत येतात. शिवाय दारूगोळा निरनिराळीं शस्त्रास्त्रें, चिलखती मोटारी, जहाजें, विमानें इ. तयार करण्यांत नैसर्गिक खनिज पदार्थांचा व कापूस, रबर इ. उद्‌भिज पदार्थांचा ऱ्हास होतो, तो वेगळाच. ह्या सर्व पदार्थांचा युद्धांत नाश होतो म्हणून तेवढ्या निसर्गसंपत्तीला मानव मुकतो. शिवाय 'दग्ध-भू' धोरणाप्रमाणे स्वतःच्या साधनसंपत्तीचा–ती शत्रूच्या हातांत पडूं नये म्हणून विध्वंस करण्यांत येतो ह्या सर्व गोष्टी जमेस धरल्या तर युद्धामुळे लोक-संख्या कमी होणें हा फायदा अत्यल्प असून नैसर्गिक संपत्तीचा नाश प्रचंड प्रमाणावर होतो, हा तोटाच फार होतो. शिवाय काम करण्यास असमर्थ असे अनेक जायबंदी लोक पुढे पोसावे लागतात; म्हणजेच श्रम न करणाऱ्या लोकांचा भार समाजावर पडतो. तेव्हा युद्धापासून होणाऱ्या हानींचें पारडें बरेंच खाली जातें, यात शंका नाही।

युद्धांचें कारण

नैसर्गिक संपत्तीचा एवढा प्रचंड विनाश करणाऱ्या युद्धांचें कारण धनतृष्णा व स्वार्थांधता होय. परदेशांतून द्रव्याचा ओघ आपल्या देशाकडे वळविणें हा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'व्यापारवादी' (mercantilists) लोकांचा बाणा असे. हेंच युद्धांचें खरें मूळ. ह्या व्यापारवादाचा युरोपांत उदय झाला व सर्व लोक ह्या महामंत्राने भारले गेले. कोलंबसाने ह्याच उद्देशाने सफरी केल्या. परदेशांना जास्तींत जास्त माल पाठवून कमींत कमी माल आयात करणें व उरलेल्या अनुकूल तफावतीबद्दल (favourable balance of trade) सोनें आणणें अशी स्वतःला अनुकूल व्यापारी पद्धत त्यांनी अमलांत आणली. स्वतःचा माल परदेशांना पाठवायचा म्हणजे तो स्वस्त पडायला पाहिजे. ह्यासाठी परदेशांतून स्वस्त कच्चा माल आणण्याचा उपक्रम सुरू झाला. हा कच्चा माल पुरविणारे देश आपल्या ताब्यांत राहावेत ह्या ईर्षेने हे देश स्वतःच्या ताब्यांत ठेवण्याची धडपड सुरू झाली. ही साम्राज्यवादाची सुरवात ह्याच कच्चा माल पुरविणाऱ्या देशांत पक्का माल विकण्यासाठी सुधारलेल्या राष्ट्रांत स्पर्धा उत्पन्न झाली. कच्च्या मालाचीं पुरवठाकेंद्रें व पक्क्या मालाच्या बाजारपेठा अशा दुहेरी नात्यांनी आवश्यक असलेले मागासलेले देश जिंकण्यासाठी व जिंक-लेले देश ताब्यांत ठेवण्यासाठी युद्धें होऊं लागलीं. नंतर वाफेचा शोध लागला. यंत्रांमुळे माल मोठ्या प्रमाणांत तयार होऊं लागला. म्हणून कच्च्या मालाची जास्त जरूर भासूं लागली. परिणाम ? कच्चा माल तयार करणारे देश व त्यांची निसर्गसंपत्ती ह्यांचें अमर्याद शोषण सुरू झालें. निसर्गाचें शोषण, साम्राज्यवाद व युद्धें ह्यांचा असा हा अन्योन्यसंबंध आहे.

युद्धामुळे लोकसंख्येचा हा प्रश्न न सुटतां तो जास्तच बिकट होतो, हें आपण पाहिलेंच. नैसर्गिक पदार्थांचा नाश होण्याला आणखी एक महत्त्वाचें कारण आहे.

स्पर्धेमुळे नैसर्गिक संपत्तीचा नाश होतो

आपापसांतल्या स्पर्धेमुळे वाजवीपेक्षा जास्त माल निर्माण होतो. माल स्वस्त विकतां यावा म्हणून तो मोठ्या प्रमाणावर निर्माण केला जातो. कारण मोठ्या प्रमाणावर माल तयार केला म्हणजे उत्पादनाचा खर्च प्रमाणांत कमी येतो. ह्यामुळे लोकांच्या गरजेपेक्षा जास्त माल उत्पन्न होतो. न खपलेला माल एकतर परदेशांत मातीमोलाने विकला जातो, किंवा त्याचा नाश करण्यांत येतो. पुरवठा जास्त होऊन किंमती पडूं नयेत म्हणून हा उपाय योजण्यांत येतो. अमेरिकेंत व ऑस्ट्रेलियांत शेतकरी एकतर गहूं जाळून टाकतात किंवा डुकरांना आणि घोड्यांना घालतात. ब्राझीलमध्ये रेल्वे एंजिनांत कोळशाऐवजी कॉफी जाळून तिचा नाश करण्यांत येतो. अमेरिकेंतील कॅलिफोर्निया संस्थानांत तर गंधकाम्ल टाकून जादा फळांना नष्ट केलें आहे. क्विनीनचा साठा जास्त होऊन त्याची किंमत घटूं नये, म्हणून सिंकोनाचीं झाडें जाळण्यात येतात. निसर्गसंपत्तीचा केवढा हा अपव्यय ! जास्त पैदास करून निसर्गाला श्रांत करावयाचें व मग त्या पदार्थांचा नाश करावयाचा. किती मूर्खपणाचा हा व्यवहार ! निसर्गाच्या समृद्धिलाहि मर्यादा ही आहेच. खनिज संपत्ति व भूमीचा कस ह्यांचा ऱ्हास झाला तर तो भरून येत नाही. म्हणजेच निसर्गाच्या ह्या अमर्याद शोषणामुळे मनुष्यजात आपलें मरण आधिकच जवळ ओढवून घेत आहे. (पाहा प्रस्तुत लेखकाचा लेख—'जगाची वाढती लोकसंख्या'—'सह्याद्रि' एप्रिल–१९५०).

कोणते उपाय योजावत ?

 निसर्गाचा हा ऱ्हास थांबविण्यासाठी वेळींच उपाययोजना झाली पाहिजे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाहीतर ' बैल गेला नि झोपा केला ' अशी परिस्थिति निर्माण व्हायची. प्रथम मनुष्याने आपल्या आवडीनिवडींवर मर्यादा घातली पाहिजे. प्रत्येक भूमि केवळ विशिष्ट पिकेंच उत्तम तयार करूं शकते. म्हणून अशा भूमीपासून तींच पिकें काढण्यात यावीं. गहूं व हरबरा उत्तम पिकविणाऱ्या भूमीपासून इतर पिकांची अपेक्षा करूं नये. नाहीतर भूमीची बरीचशी शक्ति व्यर्थ जाते. योग्य त्या भूमीपासून योग्य तीं पिकें घेतल्याने दर एकरीं उत्पादन वाढतें, कारण भूमीच्या उपजतशक्तीचा योग्य उपयोग होतो. म्हणूनच प्रत्येक भूमीच्या गुणाबद्दल संशोधन होऊन योग्य तींच पिकें काढलीं पाहिजेत.

साधी राहणी व उच्च विचारसरणी

निसर्गाचें शोषण थांबवण्यासाठी, साध्या राहणीचें तत्त्व अंमलांत आणलें पाहिजे. साध्या राहणींतल्या मनुष्याच्या गरजा अगदी कमी असतात. सुबक व तलम वस्त्रें, प्रसाधनाचीं साधनें, अद्यावत् फॅशनच्या मोटारी, इ. वस्तूंची त्याला गरज भासत नाहीं. थोडीशीं जाडीभरडीं वस्त्रें, साधें रुचकर अन्न व निवाऱ्यासाठीं एक लहानसें घर एवढेंच त्याला हवें असतें. ह्यामुळे त्याच्यासाठीं अपरिमित नैसर्गिक साधनांचा नाश होत नाहीं. पण ह्या साध्या राहणीचें तत्त्व सर्वांनींच आचरणांत आणलें तरच तरणोपाय आहे. केवळ थोड्या इसमांनी साधी राहणी स्वीकारली व इतर लोक निसर्गाचें मनःपूर्वक शोषण करीत राहिले तर काय उपयोग? लोखंड, तांबें, अभ्रक, कोळसा इ. पदार्थांच्या खाणी, समुद्रांतले मासे, खेकडे व इतर जीव व अगोदरच श्रांत झालेली भूमि ह्यांच्यावरचा लोकसंख्येचा दाब कमी झाला पाहिजे. साध्या राहणीमुळेच ही उधळपट्टी थांबूं शकेल व निसर्ग मनुष्यजातीला जास्त दिवस पोसूं शकेल.

केवळ करमणुकीच्या साठींच कितीतरी नैसर्गिक पदार्थांचा नाश होतो. केवळ चैनीसाठीं दहापांच मोटारी, स्वतःच्या आगबोटी व विमानें वापरणारा इसम केवळ्या तरी नैसर्गिक संपत्तीचा नाश करतो. ह्यासाठीं करमणूक शक्य तेवढी बौद्धिक व उच्च पातळीची असावी. एखाद्या लहानशा गोष्टीने जर अनेक लोकांचें मनोरंजन होत असेल तर तो करमणुकीचा उच्च प्रकार मानावा. गाणेंबजावणें, व्याख्यानें, वादविवाद, चित्रकला-प्रदर्शनें हे प्रकार इष्ट होत. कारण ह्यांत नैसर्गिक वस्तूंचा व्यय अगदी कमी होतो. कमींतकमी नैसर्गिक साधनें व जास्तींत जास्त मानवी श्रम लागणाऱ्या वस्तूच करमणुकीसाठीं उपयोगांत आणल्या पाहिजेत. हॉबसन ह्या अर्थशास्त्रज्ञाने चित्राचें सुंदर उदाहरण दिलें आहे. चित्र काढण्यांत नैसर्गिक संपत्तीचा अगदी कमी व्यय होतो. थोडेसे रंग व कागद एवढाच काय तो खर्च! पण ह्या साधनांना उच्च मानवी श्रमाची जोड दिली म्हणजे चित्र निर्माण होतें. हें चित्र पाहून काढणारा व इतर सर्व समाज संतुष्ट होतो. ह्याला नैसर्गिक साधनें फारच थोडीं लागतात. तेव्हा थोडक्यांत जास्त लोकांना संतुष्ट करणाऱ्या मनोरंजनाला भरपूर वाव मिळाला पाहिजे.

सारांश, निसर्गाची साधनसंपत्ति अविनाशी न मानता, जर मनुष्य निसर्गाचें शोषण कमी करील व साध्या राहणीचा व उच्च बौद्धिक करमणुकीचा स्वीकार करील तर मानवाचें भवितव्य आहे ह्यापेक्षा खात्रीने उज्ज्वल होईल, ह्यांत शंका नाही!

●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परमेश्वरा, तूं कोठे लपलास ?

★

वृत्त—शार्दूलविक्रीडित

कोठे तूं लपलास गूढतमसा साऱ्या जगाच्या पते
जेणे तापसयोगिविज्ञजनगणा त्वद्दृष्टि ना लाभते ।
क्रोधाने जरि ना जना अवयुता रूपा निजा दाविशी
' कारुण्याब्धि 'पदा न योग्य मग तूं भक्ता न कां गांजिशी ॥१॥

वेदांनी कथिलें स्तवीं स्तवियलें नानाविधीं गाइलें
त्वल्लीलांशजगच्चमत्कृतिरसा श्रद्धामुखीं चाखिलें ।
त्वच्छब्दा अनुवादिलें भणिति ही कर्णीं परी नैकिलें
स्पर्शीं स्पर्शियलें न वा न नयनीं कोणीं तुला पाहिलें ॥ २ ॥

ब्रह्मांडीं विविधां समस्त तुझिया लीला कळे ना कशी
पृथ्वीमाजि विभिन्नयोनिजननप्रेमादि उत्पादिशी ।
व्यक्ति स्वार्थपरा परी नच कधी मूळा तुला पारखी
तूंही कां न विचारितां धरुनिया देशी गड्या ओळखी ॥ ३ ॥

कैसें केलिविलासचित्र नटतें सप्रेम युग्मापुढे
प्राण्या उद्भव गर्भि होत सहजीं तन्मूळ ना सांपडे ।
पंचत्वाप्रति जाय जातजन तो केव्हां कसा नाकळे
तत्त्वें हीं मनुजा अगम्य तुझिया कारुण्यदैन्यामुळे ॥ ४ ॥

धिंगाणा वियदंगणांतरि कसा घाली ग्रहाली पहा
प्रेमें सुंदरइन्दु बिन्दुसम ती आकर्षि सर्वांसहा ।
ती नानागतिच्या ग्रहासह करी नृत्या रवीभोवती
तोही संतत कान्तसा भ्रमतसे ही का तुझी ना कृति ॥ ५ ॥

सूर्यादिप्रखरांशु कोटि गणिति व्योमान्तरा व्यापिती
तेजोनिर्भर जे किरीटसमकीं माथीं तुझ्या शोभती ।
त्यांचें कार्य कसें कुठे जनन तें अज्ञेय जीवा महा
सृष्टिज्ञान न देशि दृष्टिसह गा सारा तुझा दोष हा ॥ ६ ॥

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आत्म्यातें तुझिया प्रकल्पुनि मनीं जीवात्मता कल्पिती
ऐक्यातें उभयांचिया वदति कीं दुष्प्राप 'मुक्तस्थिती'।
त्वन्नामस्मरणा अखंड करिती त्यां भक्त संबोधिती
मुक्तीला तव भक्ति कारण असे तारे किती तोडिती ॥ ७ ॥
प्राणी प्राक्तनजन्मकर्मफलिता भोगी पुनर्जन्मुनी
प्रारब्ध क्रियमाण संचित अशा कर्मत्रया कारणीं ।
कर्मांचा परिपूर्ण नाश नच जों प्राण्यांस तो मुक्ति ना
ऐसे पंडित मानि जल्पिति सदा स्वप्रत्ययाचे विना ॥ ८ ॥
सत्यासत्यदयानयानयगुणा थारा जरी लोकि या
त्वन्न्यायी सुकठोरि देशि न च तूं ह्या कल्पना आश्रया ।
नीति भ्रामकराक्षसी बहुपरी गांजीतसे मानव
साम्राज्यीं तुझिया न बंधन असे कांहीं कुठेंही कव ॥ ९ ॥
ज्ञानप्राणविशिष्टसृष्टिरचना नानागुणीं सुंदर
आकांक्षाभरपूर्णमानस सदा कर्मींधर्मी तत्पर ।
वाटे ना निजबंधुभक्षणि घृणा प्राण्या स्वसंरक्षणीं
दृश्या ह्या हृदयंगमा न उपमा बुद्धि भ्रमे पाहुनी ॥ १० ॥
अज्ञानान्वित लोक वंचकजना ज्ञानी गुरू मानिती
सोपानक्रमबुद्धियुक्तमनुजा दैवें न अन्या गति ।
अत्याचारविवंचनादिदुरिता अस्तित्व विश्रांतरी
कां वा ! दिव्यजगन्नियंत्रणपटो तूं न्यायदाता जरी ॥ ११ ॥
अन्यायें भरली दिसे वसुमती स्वार्थैकताचिन्हिता
कार्ये कारणतत्त्वशून्य गमती सत्या नसे स्थायिता ।
तत्त्वज्ञान न तार्किकांसि गवसे सिद्धांतवाणी रिता
ईशा तूं असता जगीं जरि असा अंधार कां साहता ॥ १२ ॥
सर्वाधार समस्तविश्वजनिता सर्वा सुबुद्धिप्रद
सर्वाधीश असोनि कां दिसतसे वैषम्य हें दुःखद
नानाधर्म विभिन्नभाव रचना नानात्व संदर्शिका
वाटे हें सगळें विचित्र बघुनी विश्व स्वयंभू नका ॥ १३ ॥
रम्या सृष्टि अशी चमत्कृतिभरे ईशा तुवा निर्मिली
तेजस्वी निजमूर्ति कां न लवही कोठे कुणां दाविली ।
तूं वा नम्य जना अगम्य म्हणुनी कोणी तुला वंदिती
प्रत्यक्षाविण मानुना तुज कधी ही आमुची पद्धति ॥ १४ ॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास:महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शिखरिणी

भ्रमावे पृथ्वीने अनवरत विश्रांत गतिने
जगावे जीवाने जगति अनभिप्रेत कृतिने ।
न जाणावे कोणी परि परमतत्त्वासि अजुनी
म्हणावे कां ईशा तव कर अशा विश्वजननीं ॥ १५ ॥
वदावे एकाने अनृत परि त्या सत्य गणणे
करावे अन्याने ऋत परि असत् त्यासि वदणे ।
मिळावे ह्या न्याया स्थळ लव जरी राजभुवनीं
म्हणावे कां ईशा तव कर अशा विश्वजननीं ॥ १६ ॥
बसावे मूर्खाने जगदधिपसिंहासनपदी
नमावे सूज्ञाने अवनतपणे तन्मलपदीं ।
त्यजावे शूरांनी असुसनिज तत्कारणरणीं
म्हणावे कां ईशा तव कर अशा विश्वजननीं ॥ १७ ॥
श्रमावे एकाने अपरिमित वित्तार्जनविधीं
दुज्याने भोगावे दुरितचरिते त्या धननिधी ।
तरी वाखाणावे स्वभुजबल निर्लज्ज भुवनीं
म्हणावे कां ईशा तव कर अशा विश्वजननीं ॥ १८ ॥
वचे उच्चारावे नृपिं असहतायोग करितो
तयाचें लज्जेते त्यजुनि धरि सेवा पदहि तो ।
धरावे लोकांनी निजशिरि तया देव म्हणुनी
म्हणावे कां ईशा तव कर अशा विश्वजननीं ॥ १९ ॥
महातत्त्वज्ञानी चतुर भवपाथोधि तरणीं
ज्वलदार्कश्रेणीश्रित रत सदा ध्यानिं मननीं ।
प्रमेया त्वन्माया धरिति भवदस्तित्वरचनीं
म्हणावे कां ईशा तव कर अशा विश्वजननीं ॥ २० ॥

शिवदास कृष्ण बारलिंगे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कुठुनि तरी—

★

१

कुठुनि तरी कशी तरी ....
धावत ये तिमिरापरी
बिलग येउनी मजशी
मिळत हृदय हृदयान्तरी
भव्य दिव्य दाहकते—
स्तब्ध असह्य शिणतो जिव
धगधगत्या प्रीतीच्या
स्फुलिंगीं तिमिर बुझव

२

पेटविल्या पणतीला
कर पदराआड जरा
कंपित करतील ज्योत
पवनाच्या बघ झुळका
उंबरांत ओंठगुनि
हिंदळती अभिलाषा
ज्योतिर्मय नित नर्तनीं
ये सजवूं निरव निशा

३

साधना अमूप मूर्त
वासना विकार येत
विशुद्धता तमासहीत
कोळपुनि राख होत
अधोगती, कडेकपार
तुडवित येई समोर—
—तोंच उघडि तूं अपुल्या
हृदयाचें दिव्य द्वार

४

गहिवरले अन्तरिचे
आत्मिक स्नेहाळ भाव
बाहूंच्या विळख्यामधिं
मज गवसे स्वर्णठेव
पाकळ्यांत ओठांच्या
गुपित कुणी लपवियलें
मंत्रजागरी मनांत
प्रीतिस ह्या जागविलें

—राजा व्यवहारे
अचलपूर

●●●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१ वैजयंती

शांताराम

★

सुप्रसिद्ध कवि कुसुमाग्रज (श्री. वि. वा. शिरवाडकर) यांच्या नांवावरील हें तिसरें नाटक. ' दूरचे दिवे ' आणि ' दुसरा पेशवा ' या त्यांच्या मागील दोन नाटकांप्रमाणेच प्रस्तुत ' वैजयंती'लाहि मुंबईच्या वार्षिक नाट्योत्सवांत रंगभूमीवर येण्याचें भाग्य लाभलें. लागोपाठ तीन वर्षें मुंबई साहित्य संघाने पुरस्कारलेल्या नाटककाराच्या कृतीकडे आश्चर्याने व पूर्वग्रहाने वाचक-प्रेक्षक पाहूं लागले तर तें साहजिक आहे. एक प्रकारच्या पूर्वग्रहाने बघूनहि या वैजयंती नाटकाने प्रस्तुत समालोचकाला आपल्या गुणांनी मोहित केलें यांतच या नाटकाचें व नाटककाराचें यश आहे.

प्रसिद्ध बेलजियन नाटककार मॉरिस मेटरलिंकच्या ' मोना व्हॅना' या खळबळजनक नाटकाचें ' वैजयंती ' हें भाषांतर आहे. मूळ नाटकांतील कथासूत्र ' वैजयंतीं'त जवळ जवळ तसेंच कायम ठेवण्यात आलें आहे. रूपनगरच्या राजधानीवर विशालगडच्या सैन्याने वेढा घातला असून विशालगडच्या रत्नाकर नांवाच्या क्रूर सेनानीने प्रतिरक्षाची नाकेबंदी केली आहे अशी पहिल्या अंकाची सुरवात होते. आपल्या प्रजेला अन्नान दशेपासून वाचवण्याचा कोणताच उपाय राजा जयपाल याला दिसत नाही. तहाचीं अनेक बोलणीं करण्यांत आलीं असून तीं निष्फळ ठरलीं आहेत. शेवटचा उपाय म्हणून त्याने आपल्या वृद्ध काकांना विश्वपालांना रत्नाकराकडे पाठविलें असून त्याची जयपाल व त्याचे दोन विश्वासू अधिकारी वाट पाहात आहेत. काका विश्वपाल येऊन सांगतात की लोक समजतात तसा रत्नाकर रानटी तर नाहीच उलट तो अत्यंत विद्वान रसिक आहे. वास्तविक रूपनगरचा संपूर्ण नाश करण्याचा आदेश त्याला विशालगडाहून मिळाला असूनहि रूपनगरला जीवदान द्यायला तो तयार आहे पण त्याची अट अत्यंत भयंकर आहे. जयपालाची सौंदर्यवती पत्नी वैजयंती एका रात्रीसाठी त्याच्या तंबूंत नेसत्या वस्त्रानिशी गेली तर रूपनगरला जीवदान मिळेल—एवढेंच नव्हे तर धनधान्याच्या गाड्या रूपनगरला येतील. हजारो प्रजाजनांच्या जीवितासाठी एकाने—जयपालाने आपल्या सर्वस्वावर पाणी सोडावें हें या नाटकांतील संग्रामाचें बीज आहे. तत्त्वज्ञ विश्वपाल त्यागासाठी, प्रजा आपल्या स्वतःच्या आयुष्यासाठी, वैजयंती जनतेसाठी त्या भयंकर अटीला मान्यता देते आणि बिचाऱ्या जयपालाला स्वतःच्या आयुष्यांतील प्रीतीचा—पावित्र्याचा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होम करावा लागतो. कराराप्रमाणे वैजयंती रत्नाकराच्या तंबूकडे जावयास निघते व पहिला अंक संपतो.

दुसऱ्या अंकाची सुरवात रत्नाकराच्या तंबूत होते. विशालगडासाठी अनेक जय मिळवूनहि रत्नाकर कांही मुत्सद्यांच्या कारस्थानामुळे विशालगडच्या मर्जीतून उतरलेला असतो. त्याचा एकनिष्ठ नोकर बनवीर हाच काय तो त्याचा एकुलता एक आधार; आजच्या रात्रीं तो आपली जी इच्छा पूर्ण करून घेणार तीच एक त्याची महत्वाकांक्षा. याशिवाय त्याला कुणा व्यक्तीची व इच्छेचीं बंधनें राहत नाहीत. विशालगडचा मुत्सद्दी कैलासनाथ करूनसवरून चांगुलपणाचें कातडें पांघरतो आणि रत्नाकराला सांगतो की विशालगडचे सगळे मुत्सद्दी उलटले असूनहि तो रत्नाकराच्या पक्षाचा आहे. पण त्याच्या लबाडीने रत्नाकर फसणारा नव्हे कारण रत्नाकराला फाशीं द्यावें अशा सूचना करणारीं कैलासचीं पत्रें रत्नाकराने वाटेंत अडविलीं असतात. आपला डाव रत्नाकराला कळलेला आहे हें बघतांच कैलास रत्नाकरावर वार करतो पण रत्नाकराच्या डोक्यालाच थोडासा वार लागतो. 'आपल्या विरुद्ध असा कट कां केला ? " या रत्नाकराच्या प्रश्नाला कैलास निर्विकार-पणें उत्तर देतो की, रत्नाकराच्या शौर्यामुळे त्याचें विशालगडांत प्रस्थ वाढत आहे व नोकर कितीहि थोर झाला तरी मालकापेक्षा डोईजड होतां कामां नये; तो तसा होत असेल तर त्याचा काटा काढलाच पाहिजे. ज्या विशालगडा-साठीं आपण लढलों त्याच विशालगडकडून उद्या आपल्याला फांशी मिळणार हें रत्नाकरला स्पष्ट दिसतें. तो कैलासला कैद करतो व आजची रात्र आनंदाच्या उन्मा-दांत घालवावयाची असा निश्चय करून वैजयंतीची वाट पाहूं लागतो. वैजयंती नेसत्या वस्त्रानिशी त्याच्या तंबूत येतांच तो तिला तिच्या येण्याचें प्रयोजन सांगतो-तिने तें स्वतःच्या तोंडाने मान्य केल्यावर तो ठरल्याप्रमाणे धनधान्याच्या गाड्या शस्त्रास्त्रें रूपनगरकडे पाठवितो. वैजयंती करार पूर्ण करण्यासाठी आलेली असते. निर्विकारपणें ती कराराच्या अमलबजावणीसाठी तयार होते. पण रत्नाकराला करार नको असतो-प्रेम हवें असतें. वैजयंतीवर लहानपणापासून त्याचें प्रेम असतें. तो तिला आपली आठवण करून देतो. हळूहळू वैजयंतीला आठवूं लागतें. हा रत्नाकर म्हणजे तिचा बालपणींचा सखा नंदा. नंदाने वैजयंतीचें--विजयेचें आपलें प्रेम स्वतःच्या हृदयाशीं जतन करून ठेवलेलें असतें व त्या प्रेमासाठीच तो आतापर्यंत जगत असतो. वैजयंती त्याच्या प्रेमाची तात्त्विक थोरवी मान्य करते. रत्नाकर तिचा हात धरतो. पण तिने केवळ त्याच्या अलौकिक प्रेमाची तात्त्विक थोरवीच मान्य केली असते. जयपालावर-पतीवर तिचें व्यवहारी प्रेम असतें व त्या व्यवहारी प्रेमाचीं बंधनें ती पवित्र मानते. दोघांनाहि एकमेकांच्या उदात्ततेबद्दल खात्री पटते. रत्नाकर तिच्या शीलाचें रक्षण करतो. ती त्याची जखम बांधते. हृदयाने तीं एकमेकांजवळ येतात–देहाने नव्हे, बंधुभगिनी जवळ येतात तशी रात्र संपते. कैलासाच्या कटाप्रमाणें विशालगडाचे सैनिक रत्नाकरला अटक करण्यास येतात. बनवीरला मोकळा करून रत्नाकर जिवावर उदार होतो पण वैजयंती त्याला अशा रीतीने मरूं द्यायला तयार नसते. ज्याने तिच्या शीलाचें रक्षण केलें त्याचें रक्षण करण्याचें ती ठरविते व रत्नाकराला आश्रय देण्यासाठी रूपनगरला घेऊन येते व दुसरा अंक संपतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हजारो नागरिकांचें अभिवादन घेत वैजयंती जयपालाकडे परतते. म्हातारा विश्वपाल तिला बघायला उत्सुक झाला असतो. सगळी प्रजा त्यांच्या संरक्षणकर्त्या वैजयंतीवर फुलें उधळीत असते. पण या उत्साहांत जयपाल भाग घेऊं शकत नाही. त्याने ज्या ज्या भावना पवित्र मानल्या, जें प्रेम थोर मानलें, जीं तत्त्वें उराशीं बाळगलीं, जो स्वाभिमान जोपासला तें तें सर्व रत्नाकराच्या त्या भयंकर अटी-मुळे भस्मसात् झालें असतें व तो सूडासाठी बेभान होतो. रत्नाकराने आपल्या अंगावर हात घातला नाही या वैजयंतीच्या सांगण्यावर त्याचा विश्वास बसत नाही. त्याला नुसतें प्रेमच व्यक्त करावयाचें असतें तर मग त्याने वैजयंतीला नेसत्या वस्त्रानिशीं आपल्या तंबूत कां बोलवावें ? वैजयंती सांगते तें सत्य नाही अशी त्याची खात्री असते. त्याने वैजयंतीला माफ केलें असतें, पण त्याला सत्य हवें असतें. आणि वैजयंती सांगते तसें अतिमानवी सत्य त्याला पटत नाही. शेवटी तो वैजयंतीवर व्यभिचाराचा आरोप करतो. रत्नाकराला पाहतांच त्याला वाटतें, आपलें चुकलें. रत्नाकरावर सूड उगवण्यासाठीच तिने त्याला रूपनगरांत आणलें असावें. वैजयंती परोपरीने त्याला वस्तुस्थिति समजावून सांगते. पण ज्ञानी विश्वपालाचा अपवाद सोडून कुणालाच तिचें म्हणणें पटत नाही. जीवनांतील उदात्त घटना, अलौकिक अनुभव ज्यांना कळूं शकत नाहीं अशा अत्यंत सामान्य लोकांना आपली निष्ठा पटत नाही, आपली भूमिका कळत नाही हें बघतांच वैजयंती मानसिक बंड करते. रत्नाकराने आपल्याला शीलभ्रष्ट केलें व त्याचा सर्वांदेखत सूड घेण्यासाठीं आपण त्याला रूपनगरांत आणलें, सर्वांच्या देखत खरें सांगितल्यामुळे जयपालाला दुःख होईल म्हणून आपण खोटें बोललों असें वैजयंती म्हणूं लागतांच जयपाळ खुष होतो व तिला आलिंगन देऊं लागतो. पण वैजयंती त्याला अडवते व रत्नाकराचा सूड घेतल्याशिवाय आपल्याला समाधान मिळणार नाही अशी बाजू मांडते. रत्नाकर तिच्या असत्याचा प्रतिकार करूं लागतो पण ती त्याला हळूच सांगते, "तूं माझा आहेस," जयपालाला वाटतें वैजयंती आता रत्नाकराचा सूड घेणार, ज्ञानी विश्वपालाला समजतें की वैजयंती आता जयपालापासून कायमची दूर गेली आहे व ती शूर, उदात्त रत्नाकराची झाली आहे. तो त्यांच्या मीलनाला आशीर्वाद देतो व नाटक संपतें.

एकाचें जीवन मोलाचें की अनेकांचें ? मानवी आयुष्यांतील अकल्पित अलौकिक घटनांत नेहमींच्या मूल्यांचें स्थान काय ? स्त्रीच्या पातिव्रत्याच्या मर्यादा तिने कोठपर्यंत व कोणासाठी मानाव्या ? असें अनेक प्रश्न मेटरलिंकच्या नाटकांत मांडण्यांत येतात. जवळ जवळ हेंच प्रश्न त्याने आपल्या मेरी मॅग्डलीन मध्येंहि उपस्थित केले आहेत. त्या प्रश्नांना त्याचें उत्तर असें की मानवी मूल्यांच्या कसोटीच्या क्षणांत सगळीं मूल्यें सापेक्ष ठरतात व जीवन हेंच सर्वोत महत्तम मूल्य ठरतें. न्याय-अन्याय सत्य-असत्य, पावित्र्य वगैरे सर्व मूल्यें जीवनापुढे गौण ठरतात. या प्रकारचें तत्त्वज्ञान मांडणाऱ्या 'मोना व्हॅना' वर बंदी पडावी हें साहजिकच आहे. मोना व्हॅनाने खळबळ माजवली पण शेवटी मेटरलिंकचें म्हणणें लोकांनी ऐकून घेतलें व स्वीकारलेंहि. अशा या महत्त्वाच्या नाटकाचा अनुवाद मराठींत यापूर्वीच प्रसिद्ध व्हायला हवा होता. श्री. शामराव ओक यांनी 'गुलबग्यांची सारजा' व श्री. त्र्यं. रा. वनमाळी यांनी

'मंगळा' या नांवांनी मोना व्हॅनाचीं भाषांतरें केलीं आहेत, पण प्रसिद्धीच्या साधनांचा अभाव असल्यामुळे तीं भाषांतरें लोकांसमोर आलीं नाहीत. उशीरा कां होईना पण या जगप्रसिद्ध नाटकाचा मराठी वाचकांना आज परिचय होत आहे-शिरवाडकरांच्या प्रसन्न लेखणीद्वारें होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

वैजयंतीसाठी शिरवाडकरांनी रजपूत इतिहासाची पार्श्वभूमि घेतली आहे. जयपाल स्वत:चा रजपूत असा उल्लेख करतो खरा; परंतु एकंदरींत ही पार्श्वभूमि अत्यंत अस्पष्ट आहे. बनमालीच्या 'मंगलें'त पल्लवांची व ओकांच्या 'सारजें'त बहामनी राज्याची पार्श्वभूमि आहे व ती अधिक स्पष्ट आहे. जयपाल, विक्रांत, विश्वपाल, रूपनगर इत्यादि नांवांनी पार्श्वभूमिला विशेष उठाव येत नाही. एखाद्या स्वप्नसृष्टींत नाटकांतील प्रसंग घडत आहेत असें वाटतें. मूळ नाटकांतील तेरा-चौदाव्या शतकांतील फ्लॉरेन्सची पार्श्वभूमि सुस्पष्ट आहे.

मूळ नाटकांतील मार्को हा गिडोचा पिता तर वैजयंतींतील विश्वपाल जयपालाचा काका असा बदल भाषांतरकाराने केला आहे व शेवटी विश्वपाल रत्नाकर व आपली सून वैजयंती यांच्या मीलनाला आशीर्वाद देतो या घटनेशीं हा बदल आपल्या समाजाच्या दृष्टीने सुसंगत आहे.

दुसऱ्या अंकांतील बनवीर व रत्नाकराच्या संभाषणांतील प्रेमाबद्दलची लहानशी चर्चा शिरवाडकरांनी घातली आहे व ती निरनिराळ्या पात्रांच्या स्वभावरेषा स्पष्ट करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. मात्र त्याच अंकांत मोना व्हॅना तंबूकडे येतांना तिला चुकून कुणाची तरी गोळी लागते हा प्रसंग कां गाळला हें समजत नाही. खांद्याला गोळी चाटून गेली तरी त्याचें मोना व्हॅनाला सुखदु:ख नाही, तिच्या जखमेची प्रिंझिवॅलीला काळजी वाटते, वगैरे प्रसंगांतून पुढील परिवर्तन अधिक सहजपणें निघालेलें दिसलें असतें. वैजयंती व रत्नाकर या दोघांतील प्रसंगांत त्यामुळे अधिक काव्य व सूक्ष्मता आली असती. आहे त्या स्वरूपांत वैजयंतींतील दुसरा प्रवेश मूळ नाटकाच्या मानाने अधिक स्थूल आहे. किंबहुना सूक्ष्मतेचा अभाव वैजयंतींत अथपासून इतिपर्यंत दिसतो. विश्वपालाने रत्नाकराच्या अटीला मान्यता दिली तेव्हा मानवी स्वभावाबद्दल त्याचें परिपक्व ज्ञान, सूक्ष्मदृष्टि इत्यादि त्याचे गुण जसे प्रगट होतात तसा त्याचा मानसिक संग्राम पहिल्या अंकांत स्पष्ट होत नाही. जयपालाला त्या अटीमुळे धक्का बसतो तसाच तो विश्वपालालाहि बसतो; परंतु या आघातामुळे तो आपली बुद्धि ढळूं देत नाही इतकेंच. वैजयंतींतल्या विश्वपालाला या मानसिक संग्रामाचा फारशी जाणीव नाही. तसेंच तिसऱ्या अंकांत वैजयंती परत येते तेव्हा विश्वपालाला तिच्या असीम त्यागामुळे आनंद होतो; परंतु हा आनंद मिश्र स्वरूपाचा असतो. स्वत:च्या भूमिकेविषयी—मूल्याविषयी त्यालाहि संभ्रम पडतो. विश्वपालाच्या डोळ्यांत अश्रु येतात ते केवळ आनंदाचेच नसून मानवी जीवनाच्या मिश्र स्वरूपाचें त्याला जें दर्शन घडतें त्याचे ते अश्रु होत. जयपाल हा सामान्य माणसासारखाच वागतो. खरें म्हणजे काय होत आहे हें त्याला नीट कळत नाही. रत्नाकर ज्या चमत्कारामुळे आपल्याकडे आला त्याच चमत्कारामुळे कदाचित् निसटून जाईल अशी त्याला शंका येते असें मूळ नाटकांत आहे. वैजयंती रत्नाकराचा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बचाव करीत असतां तिचें म्हणणें पुरतें न ऐकतांच, जयपाळ तिला आलिंगन देऊं लागतो तेव्हा ती त्याला इतक्या जोरांत दूर लोटते की जयपालाला आश्चर्य वाटतें. ' इतकी शक्ति तुला कुठून आली ! ' असा आश्चर्यभराने तो तिला प्रश्न करतो परंतु भाषांतरांत हा प्रश्न गाळला आहे. एका अभूतपूर्व आपत्तींत जयपाळ सापडलेला आहे. त्याच्या आयुष्यांत घडणाऱ्या घटनांनी तो दिङ्मूढ झालेला आहे ही गोष्ट मूळ नाटकांत अधिक सूक्ष्म तऱ्हेने प्रगट होते. किंबहुना या अनुवादाविषयी साधारणपणें असें म्हणतां येईल की मूळ नाटक अधिक सूक्ष्म आहे तर भाषांतर त्या मानाने स्थूल आहे. आणि म्हणूनच वैजयंती मोना व्हॅनाच्या तुलनेने बसवायला सोपें नाटक आहे. मेटरलिंकचीं नाटकें करतांना बरीच अडचण जाते हें सुप्रसिद्धच आहे. मेटरलिंकच्या मूळ कृतींत अधिक काव्य आणि तत्त्वज्ञान आहे तर शिरवाडकरांच्या वैजयंतींत अधिक नाट्य आहे.

अर्थात् हा फरक तपशिलांत गेल्यावरच कळतो. एरवी भाषांतर अत्यंत सुरेख आहे. केवळ बुद्धीची जाणीव मान्य करणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला (अंक १ पृष्ठ १०) 'तिचा चेहरा लज्जेने लाल झाला,' (Her face grew white —अंक १ पृष्ठ ११) 'माझ्या आणि वैजयंतीच्या सन्मानाची रक्षा करायला उठलेला हा पातकी ' (अंक ३ रा पृष्ठ ५९) अशीं कांहीं वाक्यें सोडल्यास भाषान्तर निर्दोष आहे. ' चुंबनाचे—आलिंगनाचे तुकडे टाकून शरीरवासनेनं मूढ झालेल्या या श्वानाला तूं मागे घेऊन आलीस,' 'त्याची रानटी भाडोत्री तरवार एखाद्या मेलेल्या पालीसारखी निर्जीव होऊन त्याच्या कमरेला लटकते आहे,' 'या एका रात्रीच्या अंधारांत आयुष्याचीं अनेक वर्षें निखळून पडलीं' अशीं किती तरी अर्थपूर्ण सुंदर वाक्यें या अनुवादांत सर्वत्र विखुरलीं आहेत. पहिल्या अंकाच्या शेवटीं वैजयंती रत्नाकराकडे जावयास निघते तेव्हा जयपाल स्वतःला सावरून घेण्यासाठी जवळच्या दगडी पुतळ्याकडे जाऊन त्याला घट्ट धरतो. मूळ नाटकांतील दगडी खांबाऐवजीं दगडी पुतळ्याची ही योजना अधिक नाट्यमय व हृदयंगम आहे. अशीं अनेक सौंदर्यस्थळें या अनुवादांत शिरवाडकरांनी पेरलीं आहेत. बाहुलाबाहुलीच्या संसाराचें चित्रण पाहून थकलेल्या मराठी रंगभूमीला वैजयंतीसारखें काव्य आणि तत्त्वज्ञान यांचा संगम साधणारें सुरेख नाटक प्रदान केल्याबद्दल त्यांना धन्यवाद.

शान्ताराम

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

२. चालते बोलते देव

✲

लेखक— श्री. त्र्यं. नी. पंडित   प्रकाशक— के. भि. ढवळे, मुंबई
कि. १॥ रु.

बारा तेरा वर्षांपूर्वींचे मासिकांचे अंक कोणीहि चाळून पाहिले तर श्री. त्र्यं. नी. पंडित ह्यांच्या कथा विपुल संख्येने आढळतील. एक उत्तम कथालेखक म्हणून त्यांनी नांव मिळविलें आहे. ' चालते बोलते देव ' हा त्यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला संग्रह त्यांच्या कथालेखनाच्या कौशल्याची साक्ष देतो. प्रस्तुत संग्रहांतील प्रत्येक कथेंत मानवी स्वभावाचें विविध पण सोज्ज्वळ दर्शन लेखकाने घडविलें आहे. मनुष्याच्या सद्गुणांचा विकास व्हावा हा श्री. पंडितांच्या लेखनाचा हेतू दिसतो. हाच दृष्टिकोन त्यांच्या प्रत्येक कथेंत प्रकर्षाने आढळून येतो. पिल्लरपणा किंवा उसनें गांभिर्य श्री. पंडितांच्या लेखणींत नाही. विशिष्ट पात्रें डोळ्यासमोर ठेवून ते कथा लिहीत असतात असें दिसतें. पात्रांचा स्वभावपरिपोष अनुरूप घटनांच्या द्वारें साधून, वाचकांच्या मनावर एक विशिष्ट परिणाम घडवून आणण्यांत त्यांना यश लाभतें, असें हा संग्रह वाचल्यावर म्हणण्यावाचून गत्यंतर नाही. प्रस्तुत संग्रहांतील सर्व कथा सुष्ट आणि दुष्ट मनोवृत्तींतील लढा मार्मिकपणें दर्शवितात. ' चालते बोलते देव ' ह्या कथेंतील सुधा, वसंत आणि वसंताची आई ह्यांचा स्वभावपरितोष मोठ्या कौशल्याने साधला आहे. " पाठक मास्तरांची महत्त्वाकांक्षा " ह्या कथेंतील हुशार विद्यार्थ्याला सर्वतोपरी साहाय्य करणारे पण निष्कांचन विद्यार्थ्यांकडे ढुंकूनहि न पाहणारे पाठक मास्तर आणि " खऱ्याच्या दुनियें"तील फुकट वर्ग चालविणारे खरे मास्तर म्हणजे शिक्षकवर्गांतील दोन टोकें आहेत. बदलत्या कालानुसार आपण चाललें पाहिजे ही शिकवण 'चष्मा' ह्या कथेंतून मोठ्या सहजतेने पटवून देण्यांत आली आहे. 'आई, मी कधी मोठी होईन ?' ह्या कथेंतील भाऊबंदकी आणि मातेचें अपत्यप्रेम डोळ्यांत अश्रू उभे करतात. ' निर्मल प्रवाह ' ही एका प्रवाहपतिताची आणि त्याच्या पत्नीची उत्कट अशी कथा आहे. ' चुकीचें निदान, ' ' सेवाधर्म ' आणि ' जिवंत झरा ' ह्या कथा अतिशय संयम राखून लिहिण्यांत आल्या आहेत.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५८
ऑक्टोबर

श्री. पंडितांचें सर्व लिखाण सत्प्रवृत्त आहे. त्यांची भाषाशैली त्यांच्या कथा-विषयाला साजेशी अशीच आहे. सदभिरुचीला सोडून कांहीहि ते लिहीत नाहीत. त्यांच्या सर्व कथा 'कथा' ह्या संज्ञेला पात्र अशाच आहेत. कथा म्हणून लघुनिबंध त्यांनी सादर केलेले नाहीत, किंवा मध्यमवर्गीयांचें कौटुंबिक जीवनाचें चित्रण करण्याच्या निमित्तानें त्यांनी प्रत्येक कुटुंबांत हरघडी घडणाऱ्या रात्रीच्या प्रसंगांचें वर्णन केलें नाही. हे मुद्दामून निर्देश करण्यास कारणें आहेत. कौटुंबिक जीवनाचें यथार्थ दर्शन घडविण्याच्या निमित्तानें लैंगिक विषयाकडे कांही कथाकार आजकाल वळूं लागले आहेत. स्तनाग्र आणि विजेच्या बटणाचें बटन ह्यांमध्ये कांही लेखकांना साम्य दिसूं लागलें आहे. बहुरंगी आणि बहुढंगी कथा लिहिण्याची आज नवकथाकारांमध्ये स्पर्धा सुरू झाली आहे. अगदी घरगुती वातावरणांतच वाचकाला नेऊन त्याला कांही तरी नवीन देण्याचा अट्टाहास कांही कथाकार करीत आहेत. मनोविश्लेषणाच्या तथाकथित आधारावर अव्यापारेषु व्यापार करणाऱ्या मनोवृत्तींचे धागेदोरे उकलत बसण्याची कला फोफावूं लागली आहे. अति सूक्ष्मतेनें वर्णन करून मन कसें भटकत जात असतें ह्याचीं उदाहरणें देण्यांत येत आहेत; आणि हें सर्व कथा नसणाऱ्या कथांमधून ! अशा सांपतच्या वाङ्मयीन परिस्थितींत श्री. पंडित ह्यांचा हा संग्रह प्रसिद्ध झाला आहे. 'नवकथा' प्रिय असणाऱ्या वाचकांना आणि 'खांडेकर हे सामान्यांचे सामान्य लेखक' समजणारांनाहि ह्या संग्रहांतील कांही कथा ओढ लावतील असें म्हणण्यांत अतिशयोक्ति होणार नाही. श्री. पंडित ह्यांच्या कथा-निवेदनकौशल्यामुळे 'नव' आणि 'रूढ' कथांचा वाद माजविणाऱ्या चोखंदळ वाचकांना थोडें वेगळेंच वाचावयास मिळेल.

श्री. पंडित ह्यांच्या विविध विषयांवरील कथा प्रसिद्ध असतांना, प्रस्तुत संग्रहांत एका विशिष्ट धर्तीच्याच कथा कां प्रकाशित करण्यांत आल्या आहेत हें मात्र लक्षांत येत नाही. 'वनराज' व 'मायभूमीची हाक' ह्या त्यांच्या कथा अतिशय गाजल्या होत्या. कदाचित् पुढील संग्रहांत त्या पुनश्च वाचावयास मिळतील. श्री. पंडित ह्यांच्या प्रस्तुत संग्रहाचें स्वागत उत्तम होईल ह्याबद्दल शंका नाही.

मु. प. भिशीकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ररयांसाठी मंजुरी मिळालेलें

वार्षिक वर्गणी पांच रुपये] युगवाणी [सभासदांची वर्गणी तीन रुपये

★

मुंबईच्या महाराष्ट्र-साहित्यसंमेलनाचा अत्यंत महत्त्वाचा ठराव

" हिंदी संघराज्यांतील एकूण लोकसंख्येची शिरगणती लवकरच होणार असून या गणतींत नागरिकांच्या भाषेचा उल्लेख प्रधान आहे. यामुळे या शिरगणतीला भषावार राज्यरचनेच्या दृष्टीने अत्यंत महत्व प्राप्त होत आहे. विशेषतः महाराष्ट्राच्या सरहद्दीचे व सरहद्दीलगतचे जे भाग आहेत त्यांचे भाषिक स्थान या शिरगणतीच्या माहितीवरून स्पष्ट होणार असून कारवार, हल्याळ, सुपा, बेळगांव, शहापूर, सोलापूर, ठाणें जिल्ह्यांतील कांही भाग, डांग, बस्तर संस्थान, छिंदवाडा, बालाघाट वगैरे सारख्या सीमेवरील भागांच्या भाषिक व राजकीय भवितव्यावर निःसंशय परिणाम होणार आहे. म्हणून या शिरगणतीच्या वेळी भाषिक माहिती योग्य रीतीने नमूद करून घेण्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेने स्वतः व इतर संस्थांच्या सहकार्याने जोरदार प्रयत्न व प्रचार आतापासून सुरू करावा व स्वयंसेवक दल उभारून हें नोंदणीचें कार्य योग्य तऱ्हेने पार पाडून घ्यावें व दोन्ही भाषांचे गणक सरकारकडून नेमून घ्यावे असा आदेश हें संमेलन महाराष्ट्र साहित्य परिषदेस देत आहे. तसेंच हें कार्य करण्यासाठी परिषदेने जरूर तर स्वतंत्र निधि उभारावा असें हें संमेलन ठरवीत आहे. "

मराठी भाषेच्या व साहित्याच्या हिताचें हें केवढें तरी मोठें विधायक कार्य आहे. बैतूल, छिंदवाडा, बालाघाट, भंडारा बस्तर इ. जिल्ह्यांतून मराठीभाषी माणूस हा मराठी भाषी म्हणूनच नोंदला गेला पाहिजे. आज ही महत्त्वाची गोष्ट नजरेआडून निसटली तर नेहमीसाठी पस्तावावें लागेल.

★

क्षमस्व

प्रस्तुत अंकांत पृ. ३२० वरील 'संसार'च्या कवयित्री सौ. सुशीला मराठे यांचे नांव चुकून छापावयाचे राहून गेले.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कलेचें मर्म

"जो मनुष्य लोकांना खुष करण्यासाठी स्वतःची कल्पनाशक्ति कमावतो, तिचा विकास करतो, वस्त्राभूषण, केशभूषा इत्यादि करून नटतो व सजतो, लोकांना आकर्षक वाटतील असे पदार्थ निर्माण करतो, किंवा मोहक आलाप घेतो तो नट-विट-गायक-नर्तक यांच्या कोटींचा मनुष्य होय. त्याच्या विद्येने किंवा कलेने जग प्रसन्न होत असलें तरी तिच्यामुळे त्याचें स्वतःचें समाधान होत नाही. लोक त्याच्या संगीताचे भुकेले असतात व तो त्यांच्या शाबासकीचा भुकेला असतो. संगीतांत जो निरतिशय आनंद असतो त्याच्याशी तल्लीन होण्यापुरता आपला हृदयविकास त्याने केलेला नसतो. केवळ गळा कमावल्यामुळे त्याला स्वतःला काय फायदा झाला? तो समाजाचा आश्रित झाला. ज्याला आंतून आनंद मिळतो तो नित्य तृप्त असतो, स्वस्थ असतो. सहजासहजी चिडून जाणारा किंवा फुलून जाणारा गायक, चित्रकार किंवा साहित्यिक दृष्टीस पडला म्हणजे असें वाटतें कीं "हा मनुष्य गुणी आहे, परंतु कलाधर नाही." युद्ध कलेंत अनेकविध कुशलता पाहिजे असते. परंतु त्या सर्वांत मृत्यूविषयीं पर्वा नसणें, मारावयास तयार असणें व अंगांत वीर्य मुरणें याच गोष्टी मुख्य होत. त्याचप्रमाणे कलेत अनेक गोष्टींची आवश्यकता असली तरी 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि' अशाप्रकारचें अंतःरकणाचें आर्यत्व हेंच मुख्य असावयास पाहिजे. हीच जीवनाची कला होय. ही जेथे नसेल तेथे फक्त विषयाचा विलासच असणार, मग त्याला तुम्ही वाटेल तसलें गोंडस नांव द्यानात का!"

— काका कालेलकर

पत्रव्यवहाराचा पत्ता :
युगवाणी कार्यालय, धरमपेठ, नागपूर.
मुद्रक, प्रकाशक : प. वि बेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ